|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : १० | गुरुवार दि. २५ फेब्रुवारी २०२१ | पाने : ४+४ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

## “कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी हे आपल्या जीवनाचे तीन प्रमुख आधारस्तंभ असले पाहिजेत त्यासाठी ध्येय उच्च ठेवावे, कारण विशिष्ट ध्येय आणि जगण्याची प्रबळ इच्छाशक्तीच हृदयाचे ठोके सुरू ठेवते.” — भवरलाल जैन




एक थोर विभूती, भारतीय कृषी क्षेत्राचं स्वरूप पूर्णपणे बदलवणारं दूरदृष्टी असलेलं व्यक्तिमत्त्व...
कोरडवाहू जमिनीला हिरवाई देणारे आणि पडीक जमिनीचे उपजाऊ भूमीत स्थित्यंतर करणारे प्रयोगशील व्यक्तिमत्त्व.
शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी आपलं अवघं आयुष्य समर्पित करणारे ध्येयदर्शी उद्योजक. श्रमाघामानं कोरड्या नक्षत्रांना हिरवाईचं लेणं देणाऱ्या भवरलालजींच्या जीवनमूल्यांप्रती श्रद्धास्वरूप सुशोभित आणि भावपूर्ण मोजेक कलाकृती कलात्मक पद्धतीने साकार केली आहे. ज्या भूमीवर त्यांनी वत्सल हातांनी सृष्टीचं सृजन केलं होतं त्याचं स्थळी आगळ्यावेगळ्या स्वरूपातील ही कलाकृती साकार झाली आहे.

कृतज्ञतापूर्वक आदरांजलीने हे भव्य पोर्ट्रेट इतकं चोखपणे बांधण्यात आलं आहे की भाऊंनी ज्या पाईप्सच्या माध्यमातून कृषी उद्योजकीय कारकिर्दीचा पाया रचला त्या पाईप्सपासून मोजेक स्वरूपात ही कलाकृती साकार केली आहे. हेच ते पाईप्स जे आपल्या भूमीचं सिंचन करतात आणि आपल्या देशाची तहानही तृप्त करून तृषार्थाचा आशीर्वाद घेतात..

श्रद्धेय भवरलालजींच्या कार्यसंस्कृतीचा परिपाठ गिरवलेले वरिष्ठ सहकारी प्रदीप भोसले आणि त्यांच्या चमुने रचलेलं हे अनोखं पोर्ट्रेट. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डस् प्रमाणीत (GUINNESS WORLD RECORDS™ CERTIFIED) प्लॅस्टिक पाईप मधील सगळ्यात मोठी मोजेक (प्रतिमा) 1672.25 $m^2$ (18000 $ft^2$ ) या आकाराची असून श्री. भवरलाल जैन यांचे पोर्ट्रेट दर्शवते. हे साध्य केले भवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशन आणि प्रदीप विष्णू भोसले या दोघेही भारतीयांनी, दिनांक २३ फेब्रुवारी २०२१ रोजी भाऊंची सृष्टी, जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. जळगाव, महाराष्ट्र, भारत येथे प्रतिमा साकार केली.

सदर कलाकृतीची चलचित्रफित पाहण्यासाठी क्यूआरसी कोडला स्कॅन करा.

## श्रद्धेय भवरलालजी जैन यांना पाचव्या श्रद्धावंदनदिनी कृतज्ञतापूर्वक प्रणाम...

**गुरुवार, २५ फेब्रुवारी २०२१**

भवरलालजी आणि कांताई जैन परिवार
www.bhavarlaljain.in

भवरलाल अँण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन — www.bkjfoundation.org | गौराई कृषी-तंत्र निकेतन | गांधी रिसर्च फाऊंडेशन — www.gandhifoundation.net | बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट | जैन स्पोर्टस अकॅडमी — आरोग्य. आत्मनिर्भर. अमेयता. | जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. — कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.® — www.jains.com | जैन फार्म फ्रेश फुड्स लि. — मस्त चवीमागचं तुमचं पाककौशल्य. — www.jainfarmfresh.com | अनुभूति स्कूल — www.anubhutischool.in | eye care opticals | JAIN HEALTH CARE SERVICES | कांताई नेत्रालय — आय केयर फॉर यू | भाईसाहेब सुंदरलाल मल्हारा पोटेन्शियल डेव्हलपमेन्ट अकॅडमी

01 TO 07 MARCH 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 27/02/2021 8:16 PM Page 1



पान ३ वरून....

## भूतबाधा झाल्याच्या अंधश्रद्धेमुळे ...

बाधा झालीय. तिला मांत्रिकाकडे न्यायला हवे असे ते सांगू लागले आणि दीपालीला बकुला बिडकर या मांत्रिक महिलेकडे नेण्यात आले. त्या मांत्रिक महिलेने दीपालीच्या अंगावरून उतारे काढले. काही मंत्र तंत्र केले, पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. उलट तिची प्रकृती अधिकच खालावली. त्यामुळे दीपालीच्या माहेरच्यांना कळवण्यात आले. दीपालीचे माहेरचे लोकं आल्यावर मात्र त्यांनी दीपालीला रुग्णालयात नेण्याचा आग्रह धरला. त्यानुसार तिला १० तारखेला रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण तोवर उशीर झाला होता आणि उपचार दरम्यानच तिचा मृत्यू झाला. दरम्यान या प्रकरणी पोलिसांनी केवळ साधी एनसी नोंदवून घेतली होती. मात्र या घटनेची माहिती महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीला समजताच अनिसच्या नंदिनी जाधव, मिलिंद देशमुख, पांडुरंग विखे आदींनी तेथे धाव घेतली. तेंव्हा कुठे लोणावळा पोलिसांनी दीपालीचा पती महेश रघुनाथ बिडकर याच्यासह रघुनाथ बिडकर, जिजाबाई बिडकर, मोहन बिडकर, बकुला बिडकर ताडेच तांत्रिक महिले विरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. तर अन्य ५ जण फरारी आहेत. त्यांचा शोध सुरु आहे. मात्र सासरच्या लोकांच्या अंधश्रद्धेमुळे एका गर्भवती महिला तिच्या पोटातील बाळासह प्राणास मुकली.

## समाजकंटकांनी साधला नेम...

यंत्रणा हि हादरली होती. मारेकरी किती काफर होते, किती निगरगट्ट होते हे या हत्याकांडातून स्पष्ट होत होते.हे क्रूरकांड होते असे पोलीसांचे म्हणणे आहे. एका तृतीयपंथीची भर दिवसा भर रस्त्यात सर्व पादचारी समोर हत्या झाल्याने या भागात प्रचंड दहशत निर्माण झाली होती. मारेकर्यांनी हे कर्मकांड करून पोलीसांना आवाहन दिले होते. पोलीसांनी हि तात्काळ तपासावर जोर देत संशयित आरोपींचा माग काढण्यास सुरुवात केली होती.पोलीसांची विविध पथके तयार करण्यात येऊन ती पथके तपासाला रवाना झाली होती. या तपासाला जर वेळ लागला तर आरोपींना पकडणे कठीण होते. म्हणून पोलीसांनी क्षणाची उसंत न घेता या गुन्ह्याचा तपास अधिक वेगाने सुरू केला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे सर्व आरोपी मृत व्यक्तीला ओळखणारे आहेत. तसेच हे आरोपी आजूबाजूच्या विभागात राहत होते. या आरोपींचे मृत व्यक्तीसोबत छोट्याछोट्या कारणांवरुन सतत वाद व्हायचे. तृतीपंथी सुर्या या तरूणांना भारी पडत होता. सुर्याने या तरूणांमध्ये दहशत पसरवली होती. याच कारणाने संशयित आरोपींनी तृतीयपंथीयाची हत्या करण्याच्या प्लॅन तयार केला होता. भर वस्तीत सुर्याला यमसदनी पाठवण्याची तयारी करण्यात आली होती. त्यासाठी शस्त्रांची जमवाजमव ही झाली होती. २४ फेब्रुवारी रोजी दुपारी सुर्या काही कामानिमित्त घराबाहेर पडला होता. तेंव्हा दबा धरून बसलेल्या मारेकर्यांनी अचानक सुर्यावर प्राणघातक हल्ला केला. अचानक झालेल्या हल्यामुळे सुर्या घाबरला तो जीव वाचवण्यासाठी शेवटचा प्रयत्न करीत असतानाच मारेकर्यांनी त्याच्यावर हल्ला चढवला. कुणी हातोड्यांनी तर कुणी धारधार शस्त्राने त्याच्यावर सपासप वार केले. सुर्या रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे पाहून आरोपींनी घटनास्थळावरून धूम ठोकली होती. सुर्या हा स्थानिक तृतीपंथीयांचा गुरू होता.तो अनेक लोकांना मदत ही करायचा. त्यामुळे तो स्थानिक भागात तो सुप्रसिद्ध तृतीयपंथी होता. सुर्याचे मारेकरी स्थानिक तरूण असल्याची खबर पोलीसांना मिळताच पोलीसांनी आरोपीच्या मुसक्या आवळून त्यांना अटक केली.या हत्याकांडाचा अखेर उलगडा झाला आहे. याप्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली आहे. धीरज राम भूषक विश्वकर्मा (२०), विनायक राजाराम यादव (२२) आणि राजेश राजकुमार यादव (२३) अशी तिघांची नावे आहेत. तसेच यात एका १६ वर्षीय अल्पवयीन आरोपीचा समावेश आहे. मयत तृतीयपंथीच्या हत्येनंतर पोलीसांनी मारे या हत्याकांडातील चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. मुंबई पोलीस झोन अकराचे डीसीपी विशाल ठाकूर यांनी ही कारवाई केली आहे.

## देखण्या मेव्हणीला रंगेल भावोजीने ...

इतका वेळ गप्पा मारत असते हे सागरने तिला विचारल्यावर तिने त्याला लाडीकपणे सांगितले की ती तिच्या बहिणीसोबत सारखी आपल्या मोबाईलवरून बोलत असते. तिची बहिण ही बेळगाव जवळीच कोळ्यानहट्टी येथे राहत होती. बहिणीशी ती बोलत असल्याने सागरला सुरूवातील याबाबत काही शंका आली नाही. ती तिची बहिण आहे मग बोलणारच असा सागरने आणि त्याच्या घरच्या लोकांनी समज करून घेतलेला होता. परंतू पुढे पुढे तिच्या वागण्या बोलण्यात आणि राहणीमानात त्यांना फरक जाणवू लागल्याने त्यांना ही वेगळीच शंका येऊ लागली होती.सागरने तिचा मोबाईल तिच्या माघारी चेक केला होता. त्यात तिच्या बहिणीच्या नावानेच तो नंबर सेव्ह होता. इतका वेळ आणि सारखी ती आपल्या बहिणीबरोबर काय बोलत असते याचे कोडे सागर आणि त्याच्या घरच्या लोकांना पडले होते. असेच दिवसामागून दिवस जात होते. अलिकडे निलव्वा ही सोमनट्टी येथून आपल्या माहेरी किंवा बहिणीच्या गावी कोळ्यानट्टी येथे सारखी जात होती. याची शंका सागरला येऊ लागली होती. सागर आपल्यावर संशय घेत आहे याची कल्पना निलव्वाला आलेली होती. म्हणून ती आता सावध झाली होती. एक तर ती त्यांना फसवत होती आपल्या नवऱ्याला गंडवत होती. तिचे विवाहबाहय संबंध हे गेल्या दोन तीन वर्षापासून कोळनकट्टी येथील बहिणीचा नवरा बाळाप्पा दिन्नी याच्या सोबत होते. ती त्याला नात्याने मेहुणी लागत होते. बाळाप्पाने मेहुणीशी संधान साधून तिला आपल्या नादी लावलेले होते. ती ही त्याला भावोजी भावोजी म्हणत कामाला लावीत होती. कानडीत बहिणीच्या नवऱ्याला मामा म्हणत असल्याने त्या दोघांच्या नात्याची सहसा कुणाला कल्पना आलेली नव्हती. ती आपल्या माहेरी जातो असे सांगून त्याला भेटायला जात होती. त्याच्याबरोबर मजा मारीत होती.ही गोष्ट सुरूवातीला सागर याला माहित नव्हते.एकदा दोनदा तो तिच्याबरोबर आपल्या सासरवाडीत गेला होता. त्यावेळी तिला भेटायला बाळाप्पा ही कोळनकट्टीहून आलेला होता. खरे तर त्यावेळी त्याचे सासुरवाडीत काहीच काम नव्हते. त्यावेळी फक्त तो निलव्वाला भेटायला म्हणून आला होता. त्यावेळी दोघा साडू साडूनी मिळून आपल्या घशाखाली दारू रिचवली होती. त्यावेळी बाळाप्पाने त्याला जास्तच दारू पाजले होते.यापाठीमागे कारण तसेच होते.कारण त्या रात्री त्याला निलव्वाबरोबर झोपायचे होते. तिच्याबरोबर झोपून त्याला मजा मारायची होती. सागरला जास्त दारू झाल्याने तो लगेच झोपी गेला होता. मध्यरात्रीच्यावेळी बाळांप्पाने सागर झोपलेल्या खोलीत जावून निलव्वाला उठवून आपल्या खोलीत नेले होते. ती त्याला चिकटली असल्याने तिने त्याला कोणताच विरोध केलेला नव्हता. तो तिला कुणी नसलेल्या खोलीत घेऊन जावून तिच्या शरीराशी मस्ती करत होती. ती ही त्याला मामा मामा म्हणून आपल्या अंगावर ओढून घेत होते. त्या दोघांचा रोमान्स बराच वेळ चालला होता.ती गाऊनवर असल्याने तिने तिचा गाऊन वर सरकवून आपल्या कार्यक्रमाला सुरूवात केली असता ती त्याच्या दणक्याने कण्हत होती. तिच्या कण्हणाचा आवाज बाहेर जात होता. योगायोगाने तो आवाज झोपलेल्या सागरच्या कानावर गेल्यावर त्याला ही जाग आली होती. त्याने उठून बघितले तर त्याच्या शेजारी त्याची पत्नी निलव्वा नव्हती.म्हणून त्याने आवाजाचा कानोसा घेत दुसऱ्या खोलीत जावून पाहिले असता त्याला आतील नजरा बघून धक्काच बसला होता. त्याचा साडु बाळाप्पाच्या अंगाखाली त्याची पत्नी निलव्वा होती.त्या दोघांचा तो कार्यक्रम रंगात आला होता.ते दोघे ही निर्वस्त्र होते. तिच्या गोऱ्यापान शरीराला तो जोमाने रगडत होता. हे बघून सागरला राग अनावर झाला. त्याने दरवाजा ढकलून आत गेला आणि त्या दोघावर तो ओरडू लागला. त्यावेळी त्या दोघांनी त्याला कानडीत शिव्या देऊन त्यालाच मारण्याची धमकी देवून गप्प बसविले होते. तो काय समजायचे ते समजला आणि तेथून निघून गेला. दुसऱ्या दिवशी त्याने ही घटना सासरवाडीच्या लोकांना सांगितली त्यांनी ही त्यालाच गप्प बसविले उलट त्याच्याबरोबर भांडण काढून त्याला सासरवाडीतून हाकलून लावले होते. त्यादिवसापासून निलव्वा ही आपल्या माहेरीच राहत होती. सागरने आपल्या घरी येऊन घडलेली ही घटना सांगितली होती.त्यामुळे त्याने व तिच्या घरच्या लोकांनी निलव्वाला घटस्फोट देण्याचा विचार केला होता.तिला ते नांदावयला ही तयार नव्हते. आता निलव्वा ही कधी आपल्या माहेरी तर कधी बहिणीच्या गावी जावून राहत होते.त्याचे भांडण वाढलेले होते.त्यातच बरेच दिवस निघून गेले. त्यानंतर काही नातेवाईकांनी मध्यस्थी करून सागर व त्याच्या घरच्या लोकांना सांगून ही भांडणे मिटवलेली होती. सागरने ही निलव्वाकडून लिहिून घेतले होते की ती परत असे वागणार नाही. इतर कुणाशी कसलेच संबंध ठेवणार नाही. तिने ही अट मान्य केल्याने सागरने आणि त्याच्या घरच्या लोकांनी तिला घरात घेतले होते. ती नादांयला आल्यावर काही दिवसच व्यवस्थीत राहिली होती. काही महिन्यांनी ती मागचे तसे पुढे करणे चालु केले.ती परत परत आपल्या माहेरी जावू लागली तर बाळाप्पाला भेटण्यासाठी जावू लागली. ही गोष्ट सागरला समजल्यावर त्याने परत तिच्याशी भांडण काढले होते. पण ती आता कुणाचेच काही ऐकत नव्हती.तिला आता नवरा नकोच होता.तिला नवऱ्यापेक्षा तिचा भावोजी बाळाप्पाच बरा वाटत होता. ती त्याच्याबरोबरच्या संबंधाला चटावलेली होती. म्हणून तिने आता एक विचार केलेला होता. आपल्या संबंधात अडसर ठरणारा नवरा सागर याचाच कायमचा काटा काढायचा तसे तिने भावोजी बाळाप्पाला बालून ही दाखविले होते.त्याला ही त्या संबंधात तिच पाहिजे असल्याने तो ही सागरचा काटा काढायला एका पायावर तयार झाला होता. याकामासाठी त्याने आपले मित्र बसवराज यल्लापप्पा उपार आणि संपगाव येथील मंजूनाथ पिराप्पा बिडी याची मदत घेण्याचे ठरविले होते. ते दोघे ही सागर याचा बंदोबस्त करायला तयार होते. त्या दोघांची बाळाप्पाने निलव्वाशी भेट घालून दिली होती.त्यावेळी निलव्वाने त्याना ही आपल्या गोड बोलण्याने भुलवून पती सागर हा आपल्या त्रास देत आहे असे सांगून त्याचा काटा काढा असे सांगितले होते. त्या बद्दलयात बाळाप्पा आणि ती त्यांना काही रक्कम दयायला तयार झाले. त्यावर या चौघांनी मिळून सागरला मारण्याचा प्लॅन केला. सागर हा बेळगाव येथील महाद्वार रोडवर असणाऱ्या चोण्णद स्टीलच्या दुकानात सकाळी कामाला जातो हे त्यांना माहित होते. नेहमीप्रमाणे सागर हा दि.११ फेब्रुवारी २०२१ रोजी कामाला जातो असे सांगून घरातून निघून गेला होता. त्यादिवशीच त्या चौघांनी मिळून त्याचे अपहरण करण्याचे ठरविले.त्यांनी केलेल्या प्लॅननुसार बाळाप्पा हा त्याच्या कामावर गेला आणि त्याला आपले काम आहे असे सांगूनचिकण त्याला आपल्या मोटारसायकलीवर बसविले.त्यानंतर वाटेत मंजूनाथ बिडी आणि बसवराज उप्पार या दोघांनी गाठून आपण दारूची पार्टी करूया असे सागितले त्यासाठी त्यांनी जवळच्याच वाईनमधून दारू स्नॅक्स घेतले. ते चौघे ही दारूच्या पार्टीसाठी म्हणून उळवी येथील जोयडा गणेश गुडी(देऊळ) येथे आले होते.तेथे घाट रस्ता होता. तेथे त्यांनी निर्जन स्थळी संध्याकाळच्या सुमारास दारू ढोसली. त्यानंतर नशेत असताना बाळाप्पाने सागर याच्याबरोबर निलव्वाच्या संबंधावरून भांडण काढायला सुरूवात केली. त्या भांडणात बाळाप्पा सागरला म्हणाला,निलव्ववा तुझी बायको असली तरी ती माझी मेहूणी आहे. तू तिला पाहिजे तसे सुख देऊ शकत नसल्याने ती माझ्याकडे येते, आणि मी तिला तिच्या मनाप्रमाणे सुख देत असल्याने तिचे माझे संबंध आहेत.हे बाळाप्पाच्या तोंडून ऐकून सागर संतापला होता. तो त्याला शिव्या देत असताना त्या तिघांनी मिळून त्याला मारहाण करायला सुरवात केली.त्या मारहाणीत तो गंभीर जखमी झाला. त्यावेळी त्या तिघांनी मिळून त्याचा गळा दाबायला सुरूवात केली. बाळाप्पा त्याचा गळा आवळत असताना बसवराज आणि मंजूनाथने त्याचे हात पाय धरले होते. त्यातच त्याचा जागीच मृत्यू झाला होता. त्याला त्या तिघांनी जोयडा घाटातील निर्जन स्थळी टाकून तेथून पोबारा केला. कामाला गेलेला आपला मुलगा सागर हा दुसऱ्या दिवशी ही घराकडे परत न आल्याने त्याच्या घरच्या लोकांनी त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली. पण त्याचा शोध कुठेच लागत नव्हता. म्हणून त्याचे वडिल गंगाप्पा पुजारी यांनी आपला मुलगा सागर पुजारी (वय २८) हा दि.११ फेब्रुवारीपासून बेपत्ता असल्याची तक्रार दि.१३ फेब्रुवारी २०२१ रोजी मार्केट पोलीसात नोंदविली होती.पोलीस ही त्याचा कसून शोध घेत होते.पण तो कुठेच मिळून येत नव्हता. सागरच्या वडिलांनी आपल्या तक्रारीत सागरची पत्नी निलव्वावर संशय व्यक्त करून तिचे अनैतिक संबध तिचे भावोजी बाळाप्पाबरोबर असल्याची माहिती दिली होती. या एकाच संशयावरून पोलीसांनी सागरची पत्नी निलव्वाला ताब्यात घेऊन तिच्याकडे बेपत्ता सागरची चौकशी करायला सुरूवात केली असता ती पोलीसांना ताकास तूर लागू देत नव्हती.महिला पोलीसांच्याकडून तिला पोलीसी खाक्या दाखविताच तिने सागरचा काटा काढल्याचे कबुल करून आपल्या विवाहबाहय संबंधात पती सागरचा अडसर ठरत असल्याने प्रियकर बाळाप्पा दिन्नी याने आपल्या सांगण्यावरून त्याच्या दोन मित्रांच्या मदतीने काढला असल्याचे सांगितले. तिने सांगितलेल्या माहितीवरून पोलीसांनी बाळाप्पा दिन्नी त्याचे मित्र बसवराज उप्पार आणि मंजूनाथ बिडी यांना ताब्यात घेतले होते. त्यांनी दाखविलेल्या ठिकाणावरून उळवी जिल्हयातील जोयडा येथील गणेश गुडीच्या पाठीमागील घाटातील निर्जन स्थळावरून बेपत्ता सागरचा मृतदेह ताब्यात घेतला होता.त्याचा मृतदेह कुजत चालला होता.तर मृतदेहाचे काही अवशेष हे जंगली प्राण्यांनी ओरबाडून खाल्लले होते. पोलीसांनी घटनेचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शासकीय रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची तक्रार गंगाप्पा पुजारी यांनी मार्केट पोलीसात दिली असल्याने पोलीसांनी सागर गंगाप्पा पुजारी (वय २८) याचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी त्याची बायको निलव्वा पुजारी (वय २४) तिचा भावोजी बाळाप्पा दिन्नी (वय ३२) त्याचा मित्र बसवराज उप्पार (वय ३०) रा. दोघेही कोळनकट्टी आणि मंजूनाथ पिराप्पा बिडी (वय ३०) रा.संपगाव या चौघांच्या विरोधात आयपीसी कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्यांची रवानगी हिंडलगा जेलमध्ये केली होती. या दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेल्या मोटार सायकली जप्त केल्या होत्या. या घटनेचा तपास एसीपी एस.आर.कट्टीमनी,मार्केटचे पोलीस निरीक्षक संगमेश शिवयोगी, पो.उप.निरी.विठ्ठल हण्णावर कर्मचारी एस.बी.खानापुरे,विरूपाक्ष बुधणावर, एस.एस.कडोलकर, अशीर जमादार, विश्वनाथ माळगी, एस.एस. चावडी, यलाप्पा कोचरगी, चिकण्णा केरनायक यांनी पोलीस उपायुक्त डॉ.विक्रम आमटे याच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे केला. विवाहित महिला ही त्या संबंधात भरकटत गेली की ती नवऱ्याचाच गेम करीत असते हेच या घटनेवरून दिसून येते.

## प्रेमाच्या त्रिकोणात मैत्रीचा बळी ...

वस्तूने प्रहार केल्याने चेंदामेंदा झालेला होता. घटनास्थळी गर्दी झालेली होती. पोलीसांनी गर्दी हटवून पंचनाम्याला सुरूवात केली होती. मयत तरूणाची ओळख पटेल अशी कोणतीही वस्तू पोलीसांना तेथे मिळाली नाही. घटनास्थळी रक्ताने माखलेला एक सिमेंटचा पोल आणि नशा करणारे बॉन्ड पोलीसांना मिळून आले. बहुदा येथे नशा करण्यासाठी आलेल्या तरूणात वादावादी झाली असावी आणि त्यातून ही खूनाची घटना घडली असावी ही शक्यता पोलीसांनी वर्तवली होती. घटनास्थळी हातकणंगलचे पो.निरी.अशोक भांबड, इचलकरंजी गुन्हे शाखेचे स.पो.नी.विकास जाधव हे आपल्या टीमसह दाखल झाले होते. घटनास्थळी वरिष्ट पोलीस आधिकाऱ्यांनी भेट दिली होती. त्याच्या सुचनेनुसार पोलीसांनी तपासाला सुरवात करून मयत तरूणाची ओळख पटविण्याचे काम चालू केले. त्यासाठी त्याना बरीच कसरत ही करावी लागली होती. घटनेच्या काही अवधीतच मयत तरूणाची ओळख पटली होती. मयत तरूण हा रिक्षा चालवित असल्याने गर्दीतील एक दोघा जणांनी त्याची ओळख पटविलेली होती. मयत तरूण हा हातकणंगले येथील शुभम कमलाकर हा होता. पोलीसांनी त्याच्या वडिलांना घटनास्थळी बोलावून घेतले होते. त्यांनी घटनास्थळी येऊन मयत तरूण हा आपला मुलगा शुभम कमलाकर हा असल्याची ओळख पटवलेली होती. मयताची ओळख पटल्यानंतर पोलीसांनी त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी हातकणंगले येथील सरकारी रूग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलीसींनी मयत शुभम कमलाकर यांच्या वडिलाकडून घेतली असता त्याना ही घटना कुणी आणि कशासाठी केली असावी हे सांगता येत नव्हते.पोलीसांनी त्याच्याकडून जुजबी माहिती घेऊन तपासाला सुरूवात केली होती. घटनेनंतर संशयीत आरोपी घटनास्थळावरून पळून गेल्याने त्याचा काही मागमसू लागत नव्हता. पोलीसांनी त्याच्या शोधासाठी आपल्या गुप्त खबऱ्यांना ही कामाला लावले होते.तसेच मयत शुभमच्या मोबाईल कॉलचे ट्रेसिंग ही काढण्यात येत होते. त्याच्या मोबाईलवर कुणाचा शेवटचा कॉल आला होता हे तपासले जात होते. पोलीसांना गुप्त खबऱ्यांने दिलेल्या माहितीवरून मयत शुभम आणि त्याच्या एका मित्राचे एका मुलीवरून भांडणे झाली होती.त्याच्या मित्राचे व त्याचे गावातीलच एकाच मुलीवर प्रेम होते.पोलीसांनी या वरून ताडले की,हा खून शुभम याच्या जवळच्याच मित्रांनी केला आहे. जवळपास आतापर्यत या घटनेचा पोलीस तपास करीत असताना संशयीत आरोपीची नावे समजलेली होती.पोलीस त्या संशयीत आरोपीच्या मोबाईल कॉलचे लोकेशन घेत होते. दरम्यान या घटनेचा समातंर तपास इचलकरंजी शिवाजी नगरचे पोलीस ही करीत होते.त्यांना संशयीत आरोपीच्या मोबाईल लोकेशन हे हातकणंगले तालुक्यातील पट्टणकोडोली येथे दाखवित होते. बुधवार आणि गुरूवार या दोन दिवसात मा.जिल्हा पोलीस प्रमुखांच्या आदेशानुसार पोलीसांनी तपास चालू ठेवला होता. घटनेच्या दिवशी मयत शुभमच्या मोबाईलवर अनिल पांडव याचा कॉल आल्याचे पोलीसांनी केलेल्या तपासात निष्पन्न झाल्याने पोलीस त्याचा कसून शोध घेत असताना अनिल पांडव हा आपल्या तीन साथीदारासह पट्टणकोडोली येथे लपल्याची खात्रीलायक बातमी शिवाजी नगरचे पोलीस उप.निरीक्षक प्रमोद मगर यांना मिळाली होती.त्यांनी आपले वरिष्ट पो.निरी. श्रीकांत पिंगळे यांना दिली. त्याच्या मार्गशर्ननाखाली पो.उप.निरी.प्रमोद मगर याच्या पोलीस पथकाने संशयीत आरोपी अनिल पांडव, सुनिल पांडव,स्वपनिल कोळी,विरेश हिरेमठ या चौघांना पट्टणकोडोली येथून ताब्यात घेऊन त्यांना शिवाजी नगर पोलीस स्टेशनला आणले. त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना त्यांनी पोलीसांना माहिती दिली की, मयत शुभम आणि अनिल पांडव याचे एकाच मुलीवर प्रेम होते.ती मुलगी त्याच्यामते अनिल पांडव याला लाईन देत होती. म्हणून अनिल आणि सुनिल पांडव या दोघा भावांनी शुभम याला त्या मुलीचा नाद सोडायला सागितले होते. पण तो काही त्याचे ऐकत नव्हता. या कारणातून त्यांची दोन तीन वेळा भांडणे ही झालेली होती. शुभम हा हातकणलंगले ते इचलकरंची या मार्गावर आपल्या वडिलांची रिक्षा चालवित होता. त्यावेळी तो त्या मुलीला इचलकरंजीला सोडत ही होता आणि आणीत ही होता.त्यातून त्या मुलीची आणि शुभमची मैत्री घट्ट होत चालली होती. ही गोष्ट पांडव बांधवांना खुपत होती. शुभम हा त्या दोघांच्याबरोबर कधी कधी तर दारू प्यायला आणि नशा करायला बसत होता. त्यामुळे अनिल पांडव आणि सुनिल पांडव या दोघा भावांनी त्याला नशा करायला लावून त्याची गेम करायची असा प्लॅन केलेला होता. त्यांनी ठरलेल्या प्लॅनप्रमाणे मंगळवार दि.२३ फेब्रुवारी २०२१ रोजी त्याला दारूसाठी आणि नशापाण करण्यासाठी बोलावले होते.शुभमने ही त्यांना येतो असे म्हणून सागितल्याने त्यांनी तयारी केली. त्याच्या ठरलेल्या प्लॅनप्रमाणे त्या रात्री ८ वाजणेच्या सुमारास कोरोची हद्दीतील चव्हाण वाडी परिसरातील मोकळ्या जागेत येण्यास सांगितले. त्यांनी बोलावलेले म्हणून शुभम ही त्यावेळी अगदी वेळेत तेथे आला होता. तेथे अनिल पांडव, सुनिल पांडव याच्याबरोबरच त्यावेळी स्वपनील कोळी आणि विरेश हिरेमठ हें देखील होते. शुभम त्याना देखील ओळखत होता. ते पाच जण अंधारातच चव्हाणवाडीतील मागील बाजूस असणाऱ्या एका शेतात दारू पिण्यासाठी आणि नशा करण्यासाठी गेले.त्या शेतात तारेच्या कंपाऊडचे पोल ही इकडे तिकडे पडलेले होते. शेतातील काळ्या मातीत ते पाच जण दारू पित बसले असताना दारू बरोबर काही वेळाने त्यांना नशा करायला ही सुरूवात केली. दारूचा आणि त्या नशिल्या पदार्थाचा अमंल त्या पाचजणावर झालेला होता.नशेतच ते पाचजण बडबडत होते. त्यातच अनिल याने त्या मुलीचा विषय काढला ते शुभमला त्या मुलीबाबत विचारू लागले.त्यावेळी त्याने माझे त्या मुलीवर प्रेम असून मी तिचा नाद सोडणार नाही असे म्हणाताच अनिल पांडव आणि सुनिल पांडव हे दोघे त्याच्यावर तुटून पडले त्या दोघांनी त्याला मारहाण करायला सुरूवात केल्यावर स्वप्नील आणि विरेश ही शुभमला मारहाण करू लागले.त्या चौघांच्या मारहाणीत तो घायाळ झाला होता. त्यांनी त्याचा शर्टही काढून टाकला तो. ओरडत होता.पण त्या माळरानावर त्याचा आवाज ऐकायला कुणीच नव्हते.रागाच्या भरात अनिल पांडव आणि सुनिल पांडव या दोघांनी मिळून बाजुलाच पडलेला सिमेंटचा पोल उचलला आणि तो शुभमच्या चेहऱ्यावर जोरात हाणाला. त्यासरशी त्याचा चेहरा विद्रुप झाला. त्याच्या चेहऱ्यावर आणि डोक्यावर त्या पोलचा मार बसल्याने रक्तस्त्राव झाला. त्यातच त्याचा जागीच मृत्यू झाला होता.त्याचा चेहरा छिन्नविच्छन झाल्याने ओळखता ही येत नव्हता.या घटनेंतनतर घटस्थळावरून चौघांनी पळ काढला.सुरूवातील ते कोल्हापूर हायवे वरून कोल्हापूरला गेले.त्यांनी आपआपला मोबाईल स्विच ऑफ करून ठेवला. नंतर दुसऱ्या दिवशी निपाणी मार्गे परत पट्टणकोडोली येथे आला असता.पोलीसांना त्याचे मोबाईलचे लोकेशन मिळून आले. पट्टणकोडोली येथे ते एका नातेवाईकांच्या घरी थांबले असताना पोलीसांनी त्यांना तेथून जेरबंद केले.तेथे ते तिघेजण होते. त्यातील अनिल पांडव हा तेथून पळून गेलेला होता.पोलीसांनी सुनिल पांडव, विरेश हिरमेठ, स्वपनील कोळी यांना ताब्यात घेऊन इचलकरंजीला आणले. तेथे शिवाजीनगर पोलीसांनी त्यांना पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबूल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. शिवाजीनगर पोलीसांनी या तिघांना हातकणगले पोलीसांच्या स्वाधीन केले होते. हातकणगले पोलीस ठाण्यात मयत शुभमच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी शुभम कमलाकर, (वय २१) याच्या खून प्रकरणी सुनिल पांडव, अनिल पांडव, स्वप्नील कोळी विरेश हिरेमठ याच्या विरोधात गु.रजि.नं./२०२१ भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा नोंद केला. त्या तिघांना पोलीसांनी इचलकरंजी येथील न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने त्याना २८ फेब्रुवारी २०२१ पर्यतची पोलीस कोठडी सुनावली होती.या घटनेतील मुख्य फरारी आरोपी अनिल पांडव याचा शोध पोलीस घेत होते.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेल्या मोटार सायकली जप्त केल्या होत्या. या घटनेचा पुढील तपास हातकणंगले पोलीस करीत आहेत.नशा आणि दारू झाली की आजची तरूणाई कुठल्या कुठे जाते त्यातच एकदा गहन विषय असला किंवा प्रेमाचा लफडयाचा विषय असला की लगेच जागेवर या गोष्टीचा सोक्षमोक्ष लावला जातो त्यातूनच अशा खुनासारख्या घटना घडतात हेच दिसून येते.

## मालकाच्या मुलाचा राग अनावर...

लोकांच्या मदतीने त्या दोघांनी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या गणेश नामक तरूणाला लातूरच्या शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. रात्री साडेअकरा ते बारा वाजण्याच्या सुमारास उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या तरूणाचा उपचारा दरम्यान मृत्यु झाल्याची खबर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी गांधी चौक पोलिसांना दली. घटनेची माहिती मिळताच गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय हिबारे, पीएसआय वाघमारे, तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोहे. दामोदर मुळे ,दत्ता शिंदे ,गोविंद भोसले, रणवीर देशमुख यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. घटनास्थळावर पोहंचताच पोलिस निरीक्षक संजय हिबारे यांनी घटनेची प्राथमिक माहीती जाणून घेतली. तसेच पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य त्या सुचना करीत वरीष्ठांना घटनेची माहीती दिली. दरम्यान घटनास्थळाला शहर उपविभागीय पोलि अधिकारी जितेंद्र जगदाळे यांनी भेट देवून घटनेचा आढावा घेतला. प्राथमिक माहिती हास्तगत करीत पोलिस शासकीय रुग्णालयाकडे रवाना झाले. दरम्यान गणेश कदम याला दवाखान्यात शरीक करणाऱ्या त्यांच्या मित्रांची भेट घेवून पोलिसांनी त्यांना विश्वासात घेवून अधिक विचारपुस केली असता त्यातील अकलेश सूर्यवंशी यांनी संबंधित घटनेची माहिती संयम गटागटची आई वंदना गटागट यांना दिली. संयम गटागट याने गणेश कदम याच्या पोटात चाकूने वार केले असून गणेश कदम लातूरच्या शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मयत झाला असून तुम्ही ताबडतोब या असा निरोप दिला. घटनेची माहिती मिळताच वंदना गटागट या शासकीय रुग्णालयात परिसरात दाखल झाल्या. त्यांनी तेथील परिस्थितीचा आढावा घेतला यानंतर अकलेश सूर्यवंशी याला सोबत घेऊन वंदना गटागट राजीव नगर येथे गणेश कदम यांच्या घरी गेल्या, तेथे त्यांनी गणेश कदमच्या नातेवाईकांना गणेशचा अपघात झाला असून तो शासकीय रुग्णालयात उपचार घेत असल्याची माहिती दिली. बंदना गटागट खोट्या का बोलल्या असा प्रश्न पोलिसांन सतावित होता. संबंधित बावीस वर्षे मयत तरुण हा राजू नगर येथील रहिवासी असून गणेश कदम असे त्याचे नाव असल्याची खात्रीलायक माहीती पोलिसांच्या हाती आली. रुग्णालय परिसरात मोठी गर्दी झाली होती. मयताच्या नातेवाईकांनी रुग्णालय परिसरात विलाप करण्यास सुरुवात केली होती. मालकाने आमच्या मुलाचा काटा काढल्याचा आरोप मयताच्या नातेवाईकांकडून केला जात होता. पोलिसांनी मयताच्या नातेवाईकांची भेट घेवून अधिक माहीती जाणून घेतली असता गणेश कादम करत आसलेल्या दुकानाच्या मालकीणबाई वंदना गटागट यांनी गणेश कदमला अपघात झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक असून त्याला सरकारी दवाखान्यात शरीक केल्याची माहीती दिली. पण गणेशचा अपघात झाला नसून त्याचा घातपात झाल्याचे नातेवाईकांना समोर आले होते. दरम्यान पोलिसांनी वंदना गटागट यांना संर्पक साधण्याचा प्रयत्न केला मात्र वंदना गटागट शासकीय रूग्णालय परसरात नसल्याचे पोलिसांच्या चाणक्ष नजरेने टिपले. पोलिसांचे एक पथक या प्रकरणाातील संशयीत आरोपी संयम गटागट राहत आसलेल्या भागात पोंहजले पण संयम गटागट घरी नसल्याचे पोलिसांना कळाले. तसेच वंदना गटागट पण घरी आल्या नसल्याचे पोलिसांना माहीती मिळाली. येथेच पोलिसांचा संशय बळावला. मयताचा भाऊ दत्ता रमेश कदम याच्या फिर्यादीवरून गांधी चौक पोलिस ठाण्यात संशयती आरोपी संयम प्रितम गटागट याच्या विरोधात गुरनं १२७/ २१ कलम ३०२ भादविं तसेच अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर शहर विभागीय पोलिस अधिकारी जितेंद्र जगदाळे यांच्या हाती देण्यात आला. या खून प्रकरणमध्ये अॅट्रॉसिटी अक्ट असल्याने या गुन्ह्याच्या तपासाला शहर उपविभागीय पोलिस अधिकारी जितेंद्र जगदाळे यांनी तात्काळ सुरूवात केली. तपासाची चक्र गतिमान करून या प्रकरणातील संशयित आरोपी संयम प्रीतम गटागट याचा शोध घेण्यासाठी गांधी चौक पोलिस ठाणे आणि शहर उपविभागीय पोलिस अधिकारी यांचे दोन वेगवेगळे पथक तयार करून पथकाला समांतर तपासाचे आदेश दिले. गांधी चौक पोलिस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलिस पोहे. दामोदर मुळे ,दत्ता शिंदे ,गोविंद भोसले, रणवीर देशमुख यांनी काही खास खबऱ्याकडून या खून प्रकरणातील माहीती मिळवण्याचा प्रयत्न चालवीला. मयत गणेश कदम हा आई-वडील आपला मोठा भाऊ यांच्या सोबत शहरातील राजीव नगर भागात राहत होता. गणेश चा मोठा भाऊ दत्ता रमेश कदम हा लातूर शहर महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणून कार्यरत होता. गणेशने शिक्षण शिकावे अशी इच्छा त्याचा मोठा भाऊ दत्ता कदम यांची होती. मात्र गणेशला शिक्षणात रस नसल्यामुळे गणेश हा पाच सहा वर्षांपूर्वीच शिक्षण सोडून प्रितंम गटागट यांच्याकडे दुकानात कामगार म्हणून काम करत होता. दरम्यान काही दिवसांपूर्वीच प्रतिमं गटागट यांचा मुलगा संयम गटागट हा दुकान सांभाळत होता. दुकानातले सगळे व्यव्हार संयम गटागट हाताळत होता. दुकानांमध्ये जवळपास पाच नोकर होते त्यापैकी दोन नोकर बाहेरगावचे तर तीन नोकर लातूर शहरातले होते. शहरात राहणारे सर्व नोकर संयम गटागट याच्या समवयस्क आसल्याने सर्वजण मित्राप्रमाणेच राहत आसल्याची माहीती पोलिस पथकाने हास्तगत केली. पहाटे चार वाजण्याच्या सुमारास या खून प्रकरणातील संशयीत आरोपी संयम गटागट हा रेणापूर नाका परीसरात आसून तो एका खाजगी कारने पळून जाणार आसल्याची गुप्त माहीती पोलिसांना मिळाली. यावरून पोलिसांनी जुना रेणापूर नाका परीसरात सापळ लावला असता संयम गटागट एका दुकानाशेजारी अंधाराचा फायदा घेवून लपुन बसल्याचे दिसले पोलिसांनी छापा मारून संयम गटागटला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्यांने आपण पुणे येथे खाजगी वहान करून पळून जाणार होतो. मात्र वहानाच्या भाड्यासाठी तेवढे पैसे नसल्याने येथे थांबलो असून आई पैसे घेवून येत आसल्याची माहीती पोलिसांना दिली. यावरून पोलिसांनी वंदना गटागट यांना तब्यात घेत त्यांच्यावर आरोपीला पळवून लावण्यास मदत करणे या कलमाअर्तंगत सहआरोपी केले. संशयीत आरोपी संयम गटागट याला गांधी चौक पोलिसात हजर करत अधिक विचापूस केली असता त्यांने आपल्या गुन्ह्याची कबूली देत सांगण्यास सुरूवात केली.

काही दिवसांपूर्वी संयम गटागट याने ४० हजार रुपये चा मोबाईल घेतला होता. संयम गटागट यांनी मोबाईल घेतला म्हणून त्यांचे नोकर अखिलेश सूर्यवंशी, गणेश कदम व बालाजी पवार यांनी संयम गटागट यांच्याकडे पार्टीची मागणी केली. तेव्हा संयम गटागट ने पार्टीला होकार देत सगळ्यांना एकत्र पार्टी देणे शक्य नसल्याचे सांगून प्रत्येक दिवशी प्रत्येकाला एकेक करून पार्टी देण्याचा होकार दिला. सुरुवातीला अकलेश सूर्यवंशी यांना सोबत घेऊन त्याला पार्टी दिली. तर दुसर्या दिवशी गणेश कदम यांना सोबत घेऊन पार्टी दिली. तिसऱ्या दिवशी म्हणजे २२ फेब्रुवारी २०२१ रोजी रात्री नेहमी प्रमाणे दुकान बंद करून संयम गटागट याने बालाजी पवार याला पार्टी देण्यासाठी सोबत घेतले. संयम गटागट आणी बालाजी पवार जात असताना गणेश कदम यांनी संयम गटागट याला मी पण येऊ का असे विचारले मात्र संयम गटागट यांनी त्याला नकार दिला. संयम गटागट आणि बालाजी पवार गाडी वर निघून गेले. त्यावेळेस अकलेश सूर्यवंशी आणि गणेश कदम हे दोघेजण एकत्र गंजगोलाईच्या दिशेने चालत गेले. ते दोघे घंटे लॉज परीसरात गेले व तेथे त्यांनी बियर च्या दोन बाटल्या घेऊन बियर ढोसली. दरम्यान गणेश कदम यांनी बालाजी पवार यांना फोन लावून तुम्ही कुठे बसलात असे विचारले त्यावर बालाजी पवार यांनी आम्ही शहरातच बसलो असल्याचे सांगितले. मोबाईलवर बोलत बोतल बालाजी पवार आणी गणेश कदम यांच्या थट्टा मस्करी सुरू झाली. दरम्यान संयम गटागटने कोणाचा फ ोन आहे आसे विचारून बालाती पवार याच्या हातातुन मोबाईल घेत बोलण्यास सुरूवात केली. तेंव्हा गणेश आणी संयम यांच्या बोलण्या बोलण्यातून वाद झाला. संयमने फ ोन कट केला. काही वेळातच गणेश कदमने परत संयम गटागट यांच्या मोबाईलवर संपर्क साधला तेव्हा संयम गटागट याने गणेश कदमला तू कुठे आहेस असे विचारले त्यावेळेस गणेश कदम यांने घंटे लॉज परिसरात असल्याचे सांगितले. संयमाने गणेशला हत्ते कॉर्नर येथे येण्यास सांगितले. आम्ही इकडून येतो तुम्ही तिथे या आपण बोलू अस सांगितल.यावरून गणेश कदम आणि अकलेश सूर्यवंशी हत्या नगर कॉर्नर भागात आले. तेथे एका पानपुरी गाड्यावर त्यांनी पाणीपुरी खाल्ली. दरम्यान याच वेळेस संयम गटागट आणि बालाजी पवार तेथे आले. संयम गटागट यांनी गणेशाला बाजूला घेऊन बोलण्यास सुरुवात केली. मी दुकानचा मालक आहे आणी तु नोकर तरी तु माझ्यावर रूबाब झाडतोस तुझी काय औकात आहे यावरून गणेश आणि संयम यांच्यात चांगलीच झटापट सुरू झाली. तेंव्हा बालाजी पवार आणी अकलेश भांडण सोडविण्यासाठी आले पण संयमने आरे हे आमच दररेजचच आहे. अशी बतावणी करून दोघांना दुर केले. तसेच गणेशला आपण पुढच्या गल्लीत जावून बोलू म्हणून अक्षत मंगल कार्यालयाकडे नेले तेथे दोघात पुन्हा बोलण्यावरून चांगलाच वाद झाला. संयमने आपल्या सोबत आणलेला चाकू खिशातून बाहेर काढत गणेशवर वार केले. गणेश रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे पाहून संयम पेथून पळून गेला. संयमकडे चाकू कठून आला याविषयी पोलिसांनी विचारले असता तो चाकू हत्ते चौकात येताना निहाल तांबोले या मित्राकडून आणल्याचे पोलिसांना सांगितले यावरून पोलिसांनी संबधीत तरूणाला ताब्यात घेतले. पोलिसांनी या खुन प्रकरणातील तपासात आरोपी गुन्ह्यात वापरलेले हत्यार रक्तानी माखलेले कपडे जप्त केले आहेत. ही कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, लातूर शहर विभागीय पोलिस अधिकारी जितेंद्र जगदाळ, गांधी चौक पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय हिबारे, पीएसआय वाघमारे,पीएसआय एस. डी. शिंदे, तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोहे. दामोदर मुळे, दत्ता शिंदे, गोविंद भोसले, रणवीर देशमुख यांनी केली. या प्रकरणाचा पुढील तपास शहर उपविभागीय पोलिस अधिकारी जितेंद्र जगदाळे करीत आहेत.

|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : १० | सोमवार दि. ०१ मार्च २०२१ ते रविवार दि. ०७ मार्च २०२१ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## समाजकंटकांनी साधला नेम तृतीयपंथीयाचाच केला गेम

मुंबई/राजेंद्र वेदांते



मयत सुर्या

तृतीयपंथी हा खरे तर समाजातील उपेक्षित घटक. कारण त्याच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन वाईट आणि तीरस्कारी असतो. असे असतानाही काही तृतीय समाजसेवक सामाजिक कार्यातून समाजावर आपली छाप पडतात. अशा वेळी त्यांना समाजातीलच काही लोकांचा विरोध असतो. पण त्या विरोधाची जराही परवा न करता ते आपलं काम करीत असतात. गोरेगावात राहणाऱ्या सूर्या या तृतीय पंथीयाचाही तिथल्या काही सामाकंटकांशी वाद होता आणि याच वादातून त्यांनी दिवसा ढवळ्या त्या तृतीय पंठीयाची निर्घुणपणे हत्या केली. मात्र पोलिसांनी या हत्याकांडातील चौघांना अटक केली आहे.

मुंबईतील गोरेगाव पश्चिम येथील बांगुर नगर विभागात राहणाऱ्या सूर्या या तृतीयपंथीयाची २४ फेब्रुवारी रोजी हत्या करण्यात आली होती. दुपारी साडेतीनच्या सुमारास या तृतीयपंथीयाचा खून करण्यात आला होता. या तृतीयपंथीयांना मारण्यासाठी हातोडी तसेच अन्य धारदार हत्यारांचा वापर करण्यात आला होता. मारेकर्यांनी कट रचून हे हत्याकांड घडवून आणले होते. एका तृतीपंथीची हत्या झाल्याने या भागात प्रचंड खळबळ माजली होती.स्थानिक पोलीसांबरोबर गुन्हे अन्वेषण शाखेने ही तपासाला सुरूवात केली होती. या घटनेमुळे पोलीस यंत्रणा खडबडून जागी झाली होती. तृतीयपंथीचे मारेकरी कोण.? याचा शोध घेतला जात होता. मारेकर्यांनी अत्यंत निर्घृणपणे आणि निर्दयपणे हि हत्या केली होती. तृतीयापंथीचे तुकडे होईपर्यंत आरोपींनी आपली धारधार शस्त्रे चालवली होती. विशेष म्हणजे भर दुपारी हे हत्याकांड घडल्यामुळे पोलीस ...पान २ वर

# भूतबाधा झाल्याच्या अंधश्रद्धेमुळे मांत्रिकाकडे गेली वैद्यकिय उपचार वेळेत न मिळाल्याने गर्भवती मेली



लोणावळा/क्राईम रिपोर्टर

अंधश्रद्धा हा समाजाला लागलेला एक कलंक आहे. दुर्दैवाने आज विज्ञान युगातही अंधश्रद्धा जोपासली जातेय. त्यामुळे स्वतः ला ईश्वराचा अवतार मानून समाजाला देवाच्या नावाने फसवणारे आसाराम बापू, बाबा राम रहीम यांच्या सारखे लिंगपिसाट स्वयंघोषित साधू महात्मे म्हणून उदयास येतात आणि आपल्या मिठास वाणीने लाखो लोकांना आपले अनुयायी बनवून त्यांचे शोषण करतात. मुंबई सारख्या महानगरात आजही जादूटोणा करणाऱ्या बंगाली बाबांची दुकाने खुलेआम सुरु आहेत. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या पासून दाभोळकरापर्यंत अनेक समाज सुधारकांनी अंधश्रद्धेच्या विरुद्ध आवाज उठवला. पण त्यांना सरकारचा हवा तसा पाठिंबा न मिळाल्याने महाराष्ट्र सारख्या पुरोगामी राज्यात जादूटोणा विरोधी कायदा असतानाही नरबळी दिले जात आहेत. गुप्तधन आणि पुत्रप्राप्तीचे आमिष दाखवून महिलांचे लैंगिक शोषण केले जात आहे. काही दिवसांपूर्वीच शहापूर येथे अंधश्रद्धेतून मोक्ष प्राप्तीसाठी तिघांनी झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली होती. पैशाचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवून मालवण नजीकच्या नांदोस येथे १४ जणांचे बळी देण्यात आले होते. समाजातील देवावर श्रद्धा असलेल्या लोकांना देवाच्या तसेच भुताखेताच्या प्रकोपाची भीती दाखवून त्यांचे आर्थिक शोषण केले जात आहे आणि हि अंधश्रद्धा आता इतकी वाढू लागलीय कि सुटाबुटातले शिकले सवरलेले लोकं भोंदू बाबांच्या नादी लागले आहेत आणि काही ठिकाणी तर लोक आजारी माणसाला डॉक्टर कडे नेण्याऐवजी मांत्रिकाकडे नेतात. त्यातून त्या माणसाचा आजार तर बारा होत नाहीच उलट भोंदू बाबांच्या जडी बुटी आणि मंत्रतंत्राने अशा अनेक आजारी लोकांचा मृत्यू झालाय. लोणावळा येथे एका महिला तांत्रिकाच्या चुकीच्या उपचारामुळे गर्भवती महिलेचा मृत्य झाल्याने मोठी खळबळ माजली असून या प्रकरणी पोलिसांनी तांत्रिक महिलेला अटक केली आहे.

लोणावळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या शिलीममध्ये राहणाऱ्या महेश रघुनाथ बिडकर यांचा बवूर येथील दीपाली मगर बरोबर १७ महिन्यापूर्वी विवाह झाला होता. दरम्यान सासरची मंडळी दीपालीला नेहमी त्रास द्यायचे असे तिच्या माहेरच्या लोकांचे म्हणणे आहे. दरम्यान दिपाली आठ महिन्याची गर्भवती होती. तिला ८ तारखेला त्रास होऊ लागल्याने सासरच्या लोकांनी तिला डॉक्टरकडे न्यायला हवे होते. पण दीपालीचा सासरा आणि पती हे अंधश्रद्धाळू आहेत. त्यामुळे दीपालीला बाहेरची ...पान २ वर

## देखण्या मेव्हणीला रंगेल भावोजीने पटवले अडथला ठरणाऱ्या साडूला मार्गातून हटवले



मयत सागर

बेळगाव/क्राईम रिपोर्टर

साली आधी घरवाली असे म्हणतात ते काही खोटे नाही. कारण मेव्हणी देखणी असली कि भावजीची नियत खराब होते आणि मग तिला कसेही करून तो पटवतो. पण या अनैतिक खेळत दोघांचेही संसार उध्वस्त होतात. इतकेच नाही तर एखाद्याला जीवही गमवावा लागतो. बेळगाव नजीकच्या सोमाट्टी येथील सागर पुजारी याची पत्नी देखणी होती आणि तिचे तिच्याच मेव्हण्याशी अनैतिक संबंध होते. मात्र एकदा दोघांना सागरने रंगेहात पकडल्यानंतर पती पत्नी मध्ये कायमचा दुरावा आला. तिला सासरच्या आणि माहेरच्या मंडळींनी समजूनही ती ऐकत नव्हती. उलट आपल्या भावजींच्या मदतीने तिने आपल्या पतीचाच काटा काढला. या प्रकरणी आरोपी पत्नी तिचा भावजी आणि त्याच्या मित्राला पोलिसांनी अटक केली आहे.



बेळगाव सोमट्टी येथील सागर पुजारी हा महाद्वार रोडवरील चोण्णाद स्टील सेंटर मध्ये कामाला होता. त्याचा विवाह गेल्या काही वर्षापूर्वी निलव्वाबरोबर झाला होता. निलव्वा ही दिसायला देखणी आणि गोरीपान होती. लग्नानंतर त्या दोघांचे एक दोन वर्ष चांगले चालले होते. परंतू नंतर नंतर सागरला तिच्या चंचल स्वाभावाची माहिति होऊ लागली. ती आपल्या मोबाईलवरून सारखी कुणाशी तरी गप्पा मारत होती. ती सारखी कुणाशी ...पान २ वर

## प्रेमाच्या त्रिकोणात मैत्रीचा बळी गेला एका मित्राने आपल्या मित्राचा खून केला

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर



मयत शुभम

तरुण वयात प्रत्येकाला तरुण मुलीचे आकर्षण असते आणि एखादी मुलगी त्याला आवडली कि मग तिच्यासाठी तो मजनू होतो आणि त्या मुलीच्या प्रेमात पागल झालेला असा मजनू त्या मुलीसाठी काहीही करू शकतो. कुठल्याही थराला जाऊ शकतो. कारण प्रेमाच्या पुढे त्याला कशाचीही किमत नसते. अगदी नातीगोती दोस्ती यारी कशाचीच त्याला परवा नसते. हातकांगले इचलकरंजी रस्त्यावरील चव्हाण वाडीत असेच घडले. दोन मुलांचे एकाच तरुणीवर प्रेम होते. त्यावरून दोघांच्यात वाद झाला आणि एका मित्राने आपल्या भावाच्या मदतीने दुसऱ्या मित्राची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.



संगत गुण की सोबत गुण म्हणून आजचे बरेच तरूण व्यसनाच्या आहारी गेलेले आहेत. दारू गांजाच्या व्यसनासाठी ते वाटेल त्या थराला जातात. जहाँ चार या मिल जाए म्हणून मैफिल जमविली जाते. थोडी जरी नशा झाली तर मग काय विचारण्याची सोय नसते.व्यसनाच्या आहारी गेलेली तरूण पिढी खरे तर भरकटत गेली आहे. किरकोळ कारणातून भांडण उकरून काढून वादाच्या प्रसंगातून एखादयाचा गेम पध्दतशीरपणे केला जातो. आज काल खूनासारख्या घटनेला किरकोळ आणि क्षुल्लक कारण ही पुरेसे ठरत असल्याने खूनासारख्या घटनेला कारण मिळते. चव्हाण वाडी परिसरातील मागील बाजूस घडलेली खूनाची घटना ही विदारक होते. मयत तरूणाचा चेहरा जाड ...पान २ वर

## वालीव तलाठी रीना अत्राम यांचा मनमानी कारभार

### प्रजा सुराज्य पक्षाची कारवाई करण्याची मागणी

वालीव/प्रतिनिधी

वालीव तलाठी सज्जा येथील तलाठी रीना अत्राम यांच्यावर प्रजा सुराज्य पक्षाने भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले असून त्यांच्यावर कारवाई करण्याची तहसीलदारांकडे मागणी केली आहे. जनसुराज्य पक्षातर्फे वसईच्या तहसीलदारांना पाठवलेल्या तक्रार अर्जात म्हटले आहे कि वालीव तलाठी सज्जा रीना अत्राम यांच्या कार्य क्षेत्रात सरकारी व खाजगी जमिनीवर अनधिकृत बांधकामे होत असून सदर बांधकामांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. तसेच जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर नाव दाखल करणे ...पान ६ वर

वसई सेतूमधून ऑनलाईन दाखले नागरिकांना वेळेवर मिळत नव्हते म्हणून २६ जानेवारी रोजी आंदोलनाची हाक दिली होती. वसई तहसीलदार मॅडमनी या प्रकरणात लक्ष घालून आंदोलनास तुर्तास स्थगिती द्यावी अशी विनंती केली. वसईतील शेतकरी व व्यवसायिकांच्या तालुक्यातील तलाठी यांच्या विरोधात अनेक तक्रारी आल्या होत्या. पण वालिव विभागात महिला तलाठी असल्यामुळे व त्यांच्या मनमानी कारभारामुळे नागरिकांना त्रास होऊ होत आहे. म्हणूनच त्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी वसई तहसीलदार मॅडम यांच्याकडे केली आहे. मात्र वेळीच कारवाई नाही झाली तर आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्विकारावा लागेल.



– शरद (अण्णा) तिगोटे, संस्थापक अध्यक्ष प्रजा सुराज्य पक्ष

## मालकाच्या मुलाचा राग अनावर झाला चाकूचे वार करून नोकराचा खून केला

लातूर/क्राईम रिपोर्टर



मयत गणेश

मालक आणि नोकर यांचे संबंध किती जरी चांगले असले तरी नोकराने आपली पायरी ओळखून वागणे आवश्यक आहे. मालक आपल्याशी मित्रत्वाच्या भावनेने बोलतोय वागतोय याचा अर्थ आपणसुद्धा त्याच्याशी तसेच वागले पाहिजे असे नाही. उलट नोकराला आपण नोकर असल्याचे भान असायला हवे. लातूरमध्ये एका दुकानात काम करणारा गणेश कदम नेमकी हीच गोष्ट विसरला. मालकाच्या मुलाने ४० हजाराचा मोबाईल विकत घेतल्याने त्याने दुकानातल्या नोकरांना पार्टी दिली होती. अशावेळी गणेश कदम याने दुकानदाराच्या त्या मुलाचे आभारच मानायला हवे होते. पण आपली पायरी विसरून तो त्याच्याशी चुकीच्या पद्धतीने वागला. त्यामुळे मालकाच्या मुलातला मालक जागा झाला आणि एका नोकराकडून झालेला अपमान सहन न झाल्याने त्याने दारूच्या नशेत आणि संतापाच्या भरात नोकराची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



शहरातील हत्ती कॉर्नर पासून जवळच असलेल्या साळे गल्ली भागातील अक्षता मंगल कार्यालयासमोर २२ फे ब्रुवारी २०२१ रात्री १०: ३० वाजता दोन समवयस्क तरुणात हाणामारी झाली असून एकाने दुसऱ्याच्या पोटात चाकू सारख्या धारदार वार केल्याची वार्ता लातूर शहरात वार्यासारखी पसरली. अक्षता मंगल कार्यालय समोर असलेल्या रस्त्यावर एक तरूण रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता. त्याच्या शरीरातून रक्ताच्या धारा वाहत होत्या. काही काळातच घटनास्थळावर बघ्यांनी गर्दी केली. त्या गर्दीतून दोन तरुण पुढे आले त्यांनी गणेश काय झाल. कोणी मारल घाबरू नकोस असं म्हणत त्याला उचलून उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्याची तयारी चालवली. तेथे उपस्थित आसलेल्या ...पान २ वर

## संशयाने संसाराची वाताहत झाली रागाच्या भरात पत्नीची हत्या केली

जयसिंगपूर/क्राईम रिपोर्टर



मयत अर्चना

पत्नी सुंदर असली कि पतीच्या मनात नेहमीच तिच्याविषयी संशयाची पाल चुकचुकत असते आणि त्यातून तो तिच्या चारित्र्यावर संशय घेत असतो आणि एकदाका चारित्र्याच्या संशयातून पती पत्नीचे बिनसले कि मग त्यांच्यातला दुरावा वादात जातो आणि जस जसा दुरावा वाढतो तसतसा पतीच्या मनातील संशय सुद्धा वाढू लागतो आणि हाच संशय त्याला पशु बनवतो. जयसिंगपूर नजीकच्या शिरोळमध्ये अशाच एका घटनेत चारित्र्यावर संशय घेणाऱ्या पतीने पत्नीच्या हाताच्या नासा कापून पत्नीची हत्या केली आणि स्वतःही विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो बचावला असून पोलिसांनी त्याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.





आरोपी चेतन

लग्नाअगोदर पासूनच चेतन याचे अर्चनावर प्रेम होते. त्या दोघांचे प्रेम बहरत फुलत असताना त्यांनी लग्न करून संसार थाटण्याचा विचार केला. आणि गेल्या आठ वर्षापूर्वी त्याने तिच्याशी प्रेमविवाह केला. या संसार सुरूवातीला चांगला आणि सुरळीत चालू होता. लग्नानंतर चेतन हा पत्नी अर्चनाला घेऊन आपल्या आईसोबत राहू लागला. बघता बघता त्या दोघांचा संसार फुलत होता. संसार म्हटले की भांडयाला भांडे ...पान ६ वर

## वासनांध बँक म्यॅनेजरने अब्रू तिची लुटली व्यवसायाचे स्वप्न पाहणारी आयुष्यातून उठली



आरोपी शर्मा

जळगाव/क्राईम रिपोर्टर

स्त्री असो किंवा पुरुष प्रत्येकाचे एक स्वप्न असते कि आयुष्यत काही तरी करून दाखवायचे. त्यासाठी त्यांचे प्रयत्नही सुरु असतात. पण नियतीच्या मनात काहीतरी वेगळेच असते. ती स्वप्नांच्या आड येते आणि सर्व स्वप्न उध्वस्त होतात. जळगाव मधील सायलीचे महिला उद्योजक होण्याचे स्वप्न होते. मात्र हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिने ज्या बँक म्यॅनेजरवर विश्वास टाकला त्यानेच तिचे आयुष्य उध्वस्त केले. त्याने शीतपेयातून तिला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर रेप केला आणि त्याची अश्लील क्लिप बनवून तिला ब्लॅकमेल करू लागला. आपला घटस्फोट झालाय असे सांगून त्याने तिच्याही लग्न तर केले पण त्याचा घटस्फोट झालेला नव्हता. त्याने पूर्णपणे तिला फसवले होते. त्यामुळे तिचा सासर आणि उद्योजक होण्याचे स्वप्न दोन्हींचा चक्काचूर झाला. अखेर शेवटी पोलिसांकडे जाऊन तिने त्या भामट्याच्या मुसक्या आवळायला लावल्या.



यशस्वी महिला उद्योजक होण्याचे खुळ विवाहित सायलीच्या मनात एके दिवशी आले. मनातील ते खुळ पुर्ण करण्यासाठी ती कामाला लागली. पंतप्रधान रोजगार योजनेच्या माध्यमातून सुशिक्षीत बेरोजगारांना बँकेकडून कर्ज मिळत असल्याचे तिला कुणीतरी सांगीतले. या माहीतीच्या आधारे तिने बँकेत जाण्याचा निश्चय केला. शहरातील शिव कॉलनी परिसरात तिची एक मैत्रीण रहात होती. त्या मैत्रीणीला सोबत घेत तिने शिव कॉलनी लगत असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या शाखेत जाण्याचे नियोजन केले. आपल्या व्यक्तीमत्वाची छाप पहिल्याच भेटीत आणि पहिल्याच नजरेत बँक मॅनेजरवर पडली पाहीजे असे तिने मनाशी ठरवले होते. मैत्रीणी सोबत बँक मॅनेजरची भेट घेण्यासाठी तिने तयारी केली. ...पान ६ वर

# अनैतिकतेचे 'पूजा'री!

महाराष्ट्राच्या समोर आज समस्यांचा डोंगर उभा आहे. त्यात शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत ढासळलेल्या अर्थव्यवस्थेचा प्रश्न आहे. महागाई, बेरोजगारी, महिलांची सुरक्षा यासारख्या अनेक प्रश्नांबरोबरच कोरोनाचा नव्याने वाढलेला प्रादुर्भाव अशा विविध संकटांमुळे सरकार आणि जनतेची चिंता दिवसेंदिवस वाढत असताना त्याकडे दुर्लक्ष करून विरोधी पक्ष आणि अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या लोकांनी सध्या पूजा राठोड आत्महत्या प्रकरणावर रान उठवयला सुरुवात केली आहे. त्यासाठी आंदोलने केली जात आहेत. पूजा सारख्या सुशिक्षित तरुणीने आत्महत्या करणे निश्चितच दुःखद घटना आहे. पण या आत्महत्येची आता उच्चस्तरीय चौकशी सुरू आहे. त्यातून जे काही सत्य असेल ते बाहेर येईल आणि दोषींना शिक्षा होईलच. पण या फालतू मुद्यावरून आंदोलने करणे आणि लोकांना त्रास देणे तसेच पिडीत कुटुंबाला वेदना होतील अशा पद्धतीने या प्रकरणाचा बाजार मांडला कितपत योग्य आहे? विरोधक आणि तथाकथित इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या या लुडबुडीमुळे पूजाच्या आई-वडिलांनी आत्महत्येचा इशारा दिला आहे. जर या सर्व बदनामीचा कंटाळून खरोखरच त्यांनी आत्महत्या केली तर त्याला जबाबदार कोण? विरोधी पक्ष किंवा मीडियावाले त्याची जबाबदारी घेणार आहेत का? राहता राहिला सवाल या प्रकरणातील कथित आरोपी वनमंत्री संजय राठोड यांचा! तर राजकारणी लोकं या असल्या लफड्यासाठी पूर्वी पासूनच बदनाम आहेत. कारण त्यांच्यात कवडीचीही नैतिकता शिल्लक राहिलेली नाही. अधिकार, पैसा हाती आल्यावर एखादी सुंदर तरुणी दिसली की तिच्या मजबुरीचा फायदा घेऊन तिला जाळ्यात ओढायचे आणि मजा मौज करून हौस भागली की नंतर सोडून द्यायचे या असल्या राजकारण्यांच्या भानगडी काही नवीन नाहीत. आणि त्याची कितीतरी उदाहरणे देता येतील. उत्तर प्रदेशात मायावतींच्या मंत्रिमंडळातील एक तत्कालीन मंत्री अमरमणी त्रिपाठी यांनी कवियत्री असलेल्या एका २० वर्षाच्या तरुणीला गर्भवती करून सोडून दिले. त्यानंतर तिने आत्महत्या केली. अशा किती तरी घटना या देशात घडल्या आहेत. त्यापैकी काही प्रकरणात पिडीत तरुणींना न्याय मिळाला, तर काहींची प्रकरणे पैसा आणि पॉवर यांच्या बळावर दाबली गेली. काही दिवसांपूर्वी उध्दव ठाकरेंच्याच मंत्रिमंडळातील धनंजय मुंडेंच्या प्रकरणाची खूप चर्चा झाली. थोड्या दिवसांनी सगळे शांत झाले. माणसाच्या हाती एकदा का सत्ता आणि पॉवर आली की मग तो आपोआप अय्याश बनतो आणि समाजातल्या लेकिबाळींची शिकार करतो. अशा लोकांच्या बाबतीत कसे वागायचे हे जनतेने ठरवायचे आहे. पण पूजा चव्हाण प्रकरणात संजय राठोड यांना त्यांच्या समाजाने ज्या पद्धतीने पाठीशी घालण्याचा प्रयत्न चालवला आहे तो निंदनीय आहे. खास करून कोरोनाचं प्रादुर्भाव वाढलेला असताना आणि यवतमाळ येथे जिल्हा प्रशासनाने कडक निर्बंध घातलेले असताना संजय राठोड पोहरा देवीच्या मंदिरात आपल्या हजारो समर्थकांसह गेले. तिथे त्यांनी शक्ती प्रदर्शन केले. यावेळी सरकारच्या सोशल डिस्टन्सिंगच्या नियमांना पायदळी तुडवण्यात येवून प्रचंड गर्दी करण्यात आली. या गर्दीतल्या लोकांच्या तोंडाला मास्क सुद्धा नव्हते आणि हे सर्व शक्तिप्रदर्शन मंत्री असलेल्या संजय राठोड यांच्या समोर आणि त्यांना वाचवण्यासाठी सुरू होते. संजय राठोड हे पश्चिम विदर्भातील शिवसेनेचे एक बाहुबली नेते आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई होईल की नाही हे सांगता येत नाही. पण कायदा सर्वासाठी सारखा असतो हे किती खोटं आहे हेच संजय राठोड प्रकरणातून बघायला मिळाले. एकीकडे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे जनतेला सोशल डिसन्टिंग पळण्याबाबत पोटतिडकीने सांगत आहेत, तर दुसरीकडे त्यांच्याच पक्षाचे मंत्री आपल्या पक्ष प्रमुखाच्या आणि राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाला केराची टोपली दाखवत आहेत. त्यामुळे जनता काय समजायचे ते समजली आहे. अशा घटना वारंवार घडायला लागल्यानंतर लोकशाहीवर विश्वास ठेऊन जगणाऱ्या लोकांसाठी एकच प्रश्न महत्त्वाचा वाटायला लागलंय आणि तो म्हणजे अनैतिक कृत्य करणाऱ्या लोकांनाही त्यांच्या समाजाकडून केवळ जाती धर्माच्या नावाखाली पाठबळ मिळायला लागलंय. दुर्दैवाची गोष्ट अशी की संजय राठोड यांच्या प्रमाणेच पूजा राठोड ही सुद्धा बंजारा समाजाची आहे आणि या प्रकरणात बंजारा समाज विभागला गेलाय. नेता कुठल्याही जातीधर्माचां असो, त्याने जर गुन्हेगारी कृत्य केलेले असेल तर त्या प्रकरणी त्याची चौकशी होऊन त्याला शिक्षा व्हायलाच हवी. अशावेळी त्याच्या समाजाने पुढे येऊन त्याची पाठराखण करता नये. कारण असे व्हायला लागले तर पोलिस आणि न्यायपालिका यांना निःपक्षपाती पद्धतीने काम करता येणार नाही. कारण प्रत्येक नेता हा कुठल्या ना कुठल्या जातीचा असतो आणि अर्थातच त्या जातीवर किंवा त्या समाजावर त्याचा प्रभाव असतो. पण निवडणुकीसाठी किंवा विकास कामे करून घेण्यासाठी एक वेळ जातीच्या लोकांनी आपल्या नेत्याच्या मागे जायला हरकत नाही. पण त्या नेत्याने जर काही गुन्हेगारी कृत्य केलेले असेल तर मात्र त्याची पाठराखण करणे त्याच्यासाठी शक्ती प्रदर्शन करणे चुकीचे आहे आणि तसे व्हायला लागले तर लोकशाही व्यवस्था पूर्णपणे धोक्यात येईल आणि जातीपातीच्या राजकारणाचा पुन्हा दबदबा सुरू होईल जो लोकशाहीचा काळ ठरू शकतो. पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणाची दुसरी बाजू सुद्धा तपासून बघायला हवी. पूजा चव्हाण सारख्या शिकल्या सवरलेल्या मुली विवाहित माणसाच्या नादाला का लागतात तेच कळत नाही? आपले शिक्षण आपले करीयर, आपले भवितव्य आणि मुख्य म्हणजे आपल्या आई-वडिलांची इज्जत याची त्यांना काहीच फिकीर नसते. हे सगळ येवढ्या साठीच सांगायचे आहे की टाळी एका हाताने वाजत नाही. पूजा आणि संजय राठोड यांचे जे काही फोटो सोशल मीडियामध्ये व्हायरल झालेत ते पाहता या प्रकरणात पूजा आणि संजयमध्ये ज्या काही गोष्टी घडल्या असतील. त्या अर्थातच संगनमतानेच घडलेल्या असतील हे स्पष्ट आहे. अशावेळी काहीतरी चुकल्याने पूजाने निराश होऊन आत्महत्येसारखं टोकाचं पावूल उचललं असावं. पण असं घडायला नको होतं. मात्र अशा घटनांना आपण शेवटची घटना समजू शकत नाही. कारण समाजात सध्या व्यभिचार बोकाळला आहे. त्यामुळे पैशासाठी म्हणा किंवा इतर काही आकर्षणातून म्हणा पूजा सारख्या शिकल्या सवरलेल्या तरुणी कसलाही विचार न करता राजकीय पुढाऱ्यांच्या किंवा अन्य क्षेत्रातील पैसेवल्याचा नादी लागतात आणि असे लोक हे वासनांध असल्याने त्यांना एकाच स्त्रीमध्ये इंटरेस्ट नसतो. जोवर आकर्षण असते तोवर मजा मारून घेतात आणि आकर्षण संपल्यावर त्या तरुणीला तांदळा मधील खड्यासारखे बाजूला करतात. तोवर ती सर्वस्व गमावून बसलेली असते आणि त्या माणसाच्या जीवनातून जेंव्हा ती बाहेर फेकली जाते तेंव्हा इतकी निराश झालेली असते की त्याच नैराश्येतून ती आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतात. पूजाच्या बाबतीत हेच घडले असावे. पण या प्रकरणाने पुन्हा एकदा राजकारणी लोकांच्या नितिमत्तेच्या आणि विश्वास अहरतेचा पर्दाफाश झालाय. तेंव्हा असा नेता कुठल्याही समाजाचा असो त्या समाजाने गुन्हेगारी कृत्यात अडकलेल्या नेत्यांची पाठराखण करून आपली बदनामी करून घेऊ नये.

# राज्य विधी मंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सार्थकी लागो!



आजपासून राज्य विधी मंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव पुन्हा वाढल्याने अधिवेशन केवळ १० दिवसांचे असले तरी त्याचे आणखी काही दिवस कमी होण्याची शक्यता आहे. आणि विरोधी पक्षाने तशी शक्यताही वर्तवली आहे. पण राज्यासमोर समस्यांचा डोंगर उभा असताना आणि त्यावर सविस्तर चर्चा होऊन त्यातून मार्ग काढण्याची आवश्यकता असताना असे दोन चार दिवसाचे लुटूपुटूचे अधिवेशन कश्यासाठी भरवले जाते तेच कळत नाही. कारण अधिवेशनाचा बराचसा काळ राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत खर्च होतो. त्यानंतर अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी सदस्यांना पुरेसा वेळही मिळत नाही आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे अधिवेशन सुरळीत चालवण्यासाठी सरकार आणि विरोधी पक्ष दोघांकडून सुद्धा प्रामाणिक प्रयत्न केले जात नाहीत. कारण नको त्या फालतू गोष्टींवर चर्चा आणि आरडाओरडा केली जाते. या अधिवेशनात वनमंत्री संजय राठोड यांच्या राजीनाम्यावर विरोधक सरकारला घेरण्याची तयारी करीत आहेत. पण राज्यातील

**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

जनतेच्या जीवनमरणाचा इतर प्रश्नांपेक्षा हा प्रश्न खरोखरच महत्वाचा आहे का? याचा विचार विरोधी पक्षाने करायला हवा. पण जनतेच्या प्रश्नापेक्षा आपल्या पक्षाच्या फायद्याचे कुठले प्रश्न आहे, याकडे विरोधकांचा अधिक कल असतो. म्हणूनच संसदेचे असो की विधिमंडळाचे अधिवेशन जनतेच्या महत्वाच्या प्रश्नांवरील चर्चेऐवजी भलत्याच गोष्टींमुळे वादळी ठरते. लोकांना राजकारणात अजिबात इंटरेस्ट नाही. कारण कोरोना आणि लॉकडाऊनमुळे लोकांच्या आयुष्याचे गणितच बिघडून गेलेले आहे. अशावेळी सरकारकडून कोणती मदत मिळते, सरकार या समस्येतून लोकांना बाहेर काढण्यासाठी काय करणार आहे, याकडे लोकांचे अधिक लक्ष आहे. त्यामुळे या अधिवेशनात पूजा चव्हाण आत्महत्येच्या फालतू प्रकरणावर कोथ्याकूट करून लोकांच्या अपेक्षा मातीमोल करू नका. लोकांचं सर्व लक्ष अर्थसंकल्प कसा असेल याकडे लागलेले आहे. कारण अगोदरच पेट्रोल डिझेलच्या किंमती वरून लोकांमध्ये संताप आहे. अशावेळी सरकारने कोणत्याही प्रकारची कर वाढ करू नये. उलट पेट्रोल डिझेल वरील सेस कमी करावा, जेणेकरून काही प्रमाणात तरी इंधनावरच्या किमती कमी होतील. तेंव्हा जनतेच्या दृष्टीने अर्थसंकल्प आणि त्यावरील चर्चाच महत्वाची आहे. बाकी इतर कुठलेही विषय नको. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कोरोनाचा नव्याने वाढलेला प्रादुर्भाव राज्याच्या वेगवेगळ्या भागात कोरोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढतेय. त्याचा आरोग्य यंत्रणेवर ताण येतोय. त्यामुळे कोरोनाची ही दुसरी लाट कशी रोखायची यावर विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात चर्चा होणे गरजेचे आहे. विरोधी पक्ष नेत्यांनी याच प्रश्नांचे गांभीर्य लक्षात ठेऊन राज्याची आर्थिक स्थिती कशी सुधारता येईल याबाबत त्यांच्याकडे असलेल्या पर्यायांविषयी सरकारला मार्गदर्शन करावे आणि सरकार व विरोधी पक्ष यांनी समन्वयातून हे अधिवेशन केवळ आणि केवळ राज्याची आर्थिक स्थिती आणि कोरोनाची दुसरी लाट या दोन मुद्यांवर फोकस करूनच चालवावे तरच हे अधिवेशन सार्थकी लागेल.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# राज्यात 'महासमृद्धी महिला सक्षमीकरण अभियान'

## ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांची माहिती

- जागतिक महिला दिनापासून (८ मार्च) अभियान सुरु
- महिलांचा आत्मसन्मान वाढविण्यासाठी शेत दोघांचे, घर दोघांचे उपक्रम
- प्रदर्शने, कॉप शॉप तसेच सहकारी आणि कॉर्पोरेट मॉलमध्ये बचत गटांना उत्पादन विक्रीची संधी
- महिलांना पायाभूत प्रशिक्षण व उद्योजकता विकासासाठी कौशल्य प्रशिक्षण
- तंबाखुमुक्ती, मशेरीमुक्ती, तपकीरमुक्ती आदीसाठी जनजागृती
- कौटुंबिक हिंसाचार रोखण्यासाठी कायद्यांबाबत मार्गदर्शन

राज्यातील ग्रामीण भागातील महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी ग्रामविकास विभागामार्फत येत्या जागतिक महिला दिनापासून (८ मार्च) महासमृद्धी महिला सक्षमीकरण अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती ग्रामविकास मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी दिली.

या अभियान काळात शासनाच्या विविध योजना महिलांपर्यंत पोहोचवून त्याचा त्यांना लाभ मिळवून देण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने महिला बचतगटांना प्रदर्शने, कॉप शॉप तसेच सहकारी आणि कॉर्पोरेट मॉलमध्ये उत्पादनांच्या विक्रीची संधी उपलब्ध करुन देणे, महिलांचा आत्मसन्मान वाढविण्यासाठी शेत दोघांचे (७/१२ वर पती व पत्नीचे नाव लावणे) आणि घर दोघांचे (नमुना नंबर ८ वर पती व पत्नीचे नाव लावणे) या संकल्पनेअंतर्गत मालमत्तेवर पती व पत्नीचे नाव लावणे, महिलांचे हिमोग्लोबीन व बीएमआय तपासणी करुन त्यांना पोषणाबाबत मार्गदर्शन करणे, महिलांमधील तंबाखुमुक्ती, मशेरीमुक्ती, तपकीर मुक्ती आदीबाबत जनजागृती करणे, महिलांचे उपजिविकेचे स्त्रोत वाढविणे, महिलांना पायाभूत प्रशिक्षण व उद्योजकता विकासासाठी कौशल्य प्रशिक्षण देणे आदी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत, असे मंत्री ही मुश्रीफ यांनी सांगितले.

ग्रामविकास मंत्री मुश्रीफ म्हणाले की, गावपातळीवर राबविण्यात येणाऱ्या विकासाच्या विविध योजनांमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग वाढविणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने महासमृद्धी महिला सक्षमीकरण अभियान' राबविण्यात येईल. शासनाच्या संबंधीत सर्व विभागांचा यात सहभाग घेतला जाईल. अभियानात विविध उपक्रम राबविण्यात येतील. बचतगट, ग्रामसंघ आणि प्रभागसंघाच्या माध्यमातून महिलांच्या सक्षम संस्था निर्माण करण्यात येतील. महिलांचे उपजिविकेचे स्त्रोत वाढविण्यासाठी निधी आणि कर्ज उपलब्धतेसाठी मदत करण्यात येईल. महिला बचतगटांच्या उत्पादनांचे मार्केटींग करण्यासाठी आकर्षक ब्रँडींग व पॅकेजिंगवर काम करण्यात येईल. यासाठी प्रशिक्षणे व अभ्यास दौऱ्यांचे आयोजन केले जाईल. शासनाचे विविध विभाग, कार्यालये, संस्था, पंचायतराज संस्था यांना आवश्यक असणाऱ्या विविध वस्तुंची खरेदी ही बचतगटांकडून होण्यासाठी सामंजस्य करार आदी प्रयत्न करण्यात येतील. शासकीय कार्यालये आणि आवारामधील उपहारगृहे बचतगटांना चालविण्यासाठी देणे, बचतगटांना उद्योग आधार व अन्न परवाना मिळवून देणे आदीसाठी प्रयत्न करण्यात येतील. बचतगटांना उपजिविकेचे स्त्रोत उपलब्ध करण्यासाठी घरकुल मार्ट सुरु करणे, महिलांचे गवंडी प्रशिक्षण आयोजित करणे, विविध स्वास्थ्य आणि विमा योजनांमध्ये महिलांची नोंदणी करणे यासाठी कार्यक्रम घेतले जातील. महिलांना कौटुंबिक हिंसाचार व कायद्यांबाबत मार्गदर्शन करणे व कायदेविषयक मोफत सहाय्य व सल्ला देण्यासाठी उपक्रम राबविण्यात येतील. महिला लाभार्थ्यांच्या बांधकाम पूर्ण झालेल्या घरकुलांमध्ये गृहप्रवेश कार्यक्रम आयोजित करण्यात येतील, तर घरकुल मंजूर झालेल्या महिला लाभार्थ्यांच्या घरकुलांचे भूमीपूजन करुन बांधकाम सुरु करण्यात येईल. अस्मिता योजनेंतर्गत सॅनिटरी नॅपकीनची उपलब्धता आणि विक्रीस चालना देण्यात येईल. यासोबतच नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या महिला सदस्यांना पंचायतराजविषयक विविध प्रकारची प्रशिक्षणे देण्यात येतील. असे विविध उपक्रम या अभियानांतर्गत राबविण्यात येणार आहेत, असे मंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले.

### उत्कृष्ट कामगिरीसाठी होणार गौरव

यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून राज्यात कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबवून तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करीत, काळजी घेत हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात यावे, अशा सूचना सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आल्या आहेत. येत्या ८ मार्च रोजी राज्यस्तरावर या अभियानाचा शुभारंभ करण्यात येईल. त्याचवेळी जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायत पातळीवरही महिला मेळावे, प्रदर्शने आदींचे आयोजन करुन या अभियानाचा प्रारंभ करण्यात येईल. अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मुल्यमापन होण्याच्या दृष्टीने राज्य, विभाग, जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायत पातळीवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणारे जिल्हे, तालुके आदी विविध घटकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल, अशी माहितीही मंत्री मुश्रीफ यांनी दिली.

# सन २०२१-२२ नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इयत्ता पहिली व इयत्ता दुसरीमध्ये प्रवेश अर्ज सादर करावे

**पालघर/प्रतिनिधी**

आदिवासी विकास विभाग अंतर्गत प्रकल्प कार्यालय, डहाणू मार्फत इयत्ता १ ली व इयत्ता २ री करीता प्रवेश अर्ज प्रकल्प कार्यालय, डहाणू येथे २६/०२/२०२१ ते दिनांक १०/०३/२०२१ या कालावधीत वाटप व भरून देण्यात यावा. प्रवेश फॉर्म घेतांना प्रकल्प कार्यालय शासकीय आश्रमशाळा शासकीय वसतिगृह येथुन प्राप्त केलेलेच फॉर्म स्वीकारले जातील झेरॉक्स फॉर्म ग्राह्य धरण्यात येणार नाही. सदर फार्म विनामुल्य उपलब्ध आहेत. सदरचे प्रवेश फॉर्म इ. पहिली व २ री करीता सुट्टीचे दिवस वगळुन सकाळी १० ते सायंकाळी ६ यावेळेत उपलब्ध होतील. प्रवेश घेऊ इच्छिणारा विद्यार्थी, विद्यार्थीनी अनुसूचित जमातीचा असावा, पालकांच्या नावे सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या (तहसिलदाराने) अनुसूचित जमातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत सादर करावी, विद्यार्थी, विद्यार्थीनी हे तलासरी, डहाणू, पालघर व वसई या तालुक्याच्या कार्यक्षेत्रातील रहिवाशी असावे, पालकांचे रहिवाशी प्रमाणपत्र सादर करावे, पालक दारीद्र्य रेषेखालील असल्यास यादितील अनुक्रमांक असलेला ग्रामसेवकाचा दाखला सादर करावा, पालक दारीद्र्य रेषेखालील नसल्यास त्यांच्या कटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. १,००,०००/- पेक्षा जास्त नसावे. त्याबाबतचे पालकांनी मागील वर्षाचे (सन २०२०-२१ चे) सर्व मार्गानी मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न रु. १,००,०००/- पेक्षा जास्त नसल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याचा उत्पन्नाचा दाखला सादर करावा, इ. १ ली मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याचा जन्म दाखला किंवा अंगणवाडीचा दाखला सादर करावा, इ. १ ली साठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याचे वय ३० सप्टेंबर, २०२१ रोजी ६ वर्ष पूर्ण असावे. तसेच त्याचा, तीचा जन्म दिनांक ०१ ऑक्टोंबर, २०१४ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ दरम्यान असावा, इ. २ रीच्या वर्गात प्रवेशासाठी सदर विद्यार्थी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये इ. १ ली मध्ये प्रवेशीत असल्याबाबतचे बोनाफाईड सादर करावे, विद्यार्थ्याचे आधारकार्ड आवश्यक आहे, विद्यार्थ्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र आवश्यक आहे, विद्यार्थ्याचे पालक शासकिय अथवा निमशासकिय विभागात नोकरीत नसावे. त्याबाबतचे हमीपत्र सादर करावे, विद्यार्थ्याचे नजिकच्या काळातील असलेले पासपोर्ट साईजचा फोटो सादर करावा, महिला पालक विधवा, घटस्फोटीत, निराधार, परितक्त्या असल्यास ग्रामपंचायतीचा दाखला सादर करावा, निवड झालेल्या विद्यार्थ्याला एकदा शाळा निश्चिती झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत पालकांच्या व पाल्यांच्या विनंतीनुसार शाळा बदलता येणार नाही याबाबत पालकांचे हमीपत्र सादर करावे, अपूर्ण व उशिरा प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. इयत्ता १ ली व इयत्ता २ री करीता शहरातील नामांकित शाळेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणूच्या प्रकल्प अधिकारी, आशिमा मित्तल यांनी केले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# लग्न समारंभात चोऱ्या करणारी टोळी जेरबंद



**अहमदनगर/प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात येवून लग्नसमारंभातील रोख रक्कम व दागिने चोरणा-या टोळीचा पर्दाफास अहमदनगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लावला आहे. आरोपींना मध्यप्रदेशातून जेरबंद करण्यात आले असून त्यांच्याकडून विविध गुन्ह्यांचा तपास लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. १ डिसेंबर २०२० रोजी मुंबई येथील रहिवासी नवनीत मिश्रा हे त्यांच्या मुलाच्या लग्नासाठी शिर्डी येथील साई निम ट्री हॉटेल येथे कुटूंबासह मुक्कामी आले होते. लग्नात खर्चासाठी त्यांनी दिड लाख रुपये बॅगेत सोबत आणले होते. लग्न समारंभात रात्रीआठ वाजता फोटोसेशनसाठी ते स्टेजवर गेले होते. दरम्यानच्या कालावधीत रोख रक्कम असलेली बॅग त्यांनी जवळच खुर्चीवर ठेवली होती. फोटो सेशन आटोपल्यानंतर त्यांना खुर्चीवर बॅग आढळून आली नव्हती. या बॅगेच्या चोरीबाबत शिर्डी पोलिस स्टेशनला गु.र.न. ७६०/२० भा.द.वि. ३७९ नुसार अनिल कुमार उपाध्याय, शिर्डी यांनी फिर्याद दाखल केली होती. यानंतर देखील शिर्डी शहर व जिल्ह्यात अशा घटनांचा क्रम सुरुच होता. या गुन्ह्यांचा समांतर तपास शिर्डी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. अनिल कटके व त्यांच्या पथकाकडून सुरु होता. पो.नि. अनिल कटके यांच्या मार्गदर्शना खाली पथकातील स.पो.नि. मिथून घुगे, गणेश इंगळे, सहायक फौजदार सोन्या बापू नानेकर, पो.हे.कॉ. दत्तात्रय हिंगडे, संदीप घोडके, पो.ना. संदीप पवार, सुनिल चव्हाण, शंकर चौधरी, विशाल दळवी, रवि सोनटक्के, दिपक शिंदे, पो.कॉ. संदीप दरंदले यांनी तपासकामात झोकून देत आरोपींचा माग काढत मध्य प्रदेश गाठले. तांत्रीक माहितीसह खब-यांच्या सहकार्याने मध्यप्रदेशातील आरोपी गोलू सुमेर मोजा उर्फ सिसोदीया (२५)मुळ रा. बडा पिपलीया, जि. देवास, मध्यप्रदेश, हल्ली राहणार बजारपूर, जयपूर, शानमंदीर, गल्ली नं. ४, मकान नं. ३८०, न्यु दिल्ली, संदीप सुमेर झोजा उर्फ सिसोदीया (१९) मुळ रा. बडा पिपलीया, जि. देवास, मध्यप्रदेश हल्ली राहणार बजारपूर, जयपूर, ज्ञानमंदीर, गल्ली नं. ४, मकान नं. ३८०, न्यु दिल्ली, यांना पिपलीयों, मध्यप्रदेश यांना शिताफीने ताब्यात घेण्यात आले.

अधिक चौकशीअंती त्यांचे साथीदार राधेशाम उदयराम राजपूत(३०) रा. अलीविहार, ए-३१०, सरिता विहार, दिल्ली, विपीन राजपाल सिंग (२१) व १/२ पत कॉलनी, मिठापूर एक्स्टेंशन, घर नं. २८९, गल्ली नं.४, नवी दिल्ली, गिरीराज दिनेशचंद शुक्ला (५५), रा. ए-९७८/११ जैथपूर, पार्ट-२, बदरपूर, नवी दिल्ली, अनिल कमल सिसोदीया (३०) हल्ली राहणार जैथपूर, बदरपूर, ज्ञानमंदीर, गल्ली नं. ४, मकान नं. ३८०, नवी दिल्ली, मुळ राहणार बडा पिपलीय, जि. देवास, मध्यप्रदेश, विशाल कूमार बनी सिंग (१९) रा. ९८ ए, रोशननगर, अगवानपूर, हरियाणा यांना देवास, मध्यप्रदेश यांना विविध ठिकाणाहून ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या रोख रकमेपैकी ५५ हजार रोख व गुन्ह्यात वापरलेली १३ लाख रुपये किमतीची हुंडाई व्हेन्यु कार (एमपी ०९ सीसीएस ७४५० व ९ लाख रुपये किमतीची मारुती सुझुकी कंपनीची पांढ-या रंगाची बलेनो कार (एमपी ०९ डब्ल्युजी ५८१३) तसेच ७८ हजार रुपये किमतीचे वेगवेगळ्या कंपन्यांचे सहा मोबाईल फोन असा एकूण २३ लाख ३३ हजार रुपये किमतीच्या मुद्देमालासह रोख रक्कम हस्तगत करण्यात आली. त्यांना अटक केल्यानंतर शिर्डी पोलिस स्टेशनला हजर करण्यत आले. अटकेतील आरोपींनी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात अशा स्वरुपाचे गुन्हे केले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यानुसार पुढील चौकशी व तपास सुरु आहे. अहमदनगर जिल्हा पोलिस अधिक्षक मनोज पाटील, अप्पर पोलिस अधिक्षीका (श्रीरामपूर) दिपाली काळे, उप विभागीय पोलिस अधिकारी शिर्डी संजय सातव यांच्या मार्गदर्शना खाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.अनिल कटके व त्यांच्या पथकाने या कारवाईत सहभाग घेत तपास यशस्वी केला.

# देवणी पंचायत समिती सभापतीपदी भाजपच्या सविता धनराज पाटील यांची बिनविरोध निवड



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील दवणहिप्परगा पंचायत समिती गणातून निवडून आलेल्या भारतीय जनता पार्टीच्या सविता धनराज पाटील यांची गुरुवार दि.२५ फेब्रुवारी रोजी देवणी पंचायत समितीच्या सभापतीपदी बिनविरोध निवड करण्यात आली. देवणी पंचायत समितीच्या सभापतीपदी असलेल्या धनेगाव येथील चित्रकला बिरादार यांचा सभापतीपदाचा कार्यकाळ संपल्यांने त्यांनी गेल्या महिन्यात सभापतीपदाचा राजीनामा दिला होता. तेंव्हा पासून सभापती पद रिक्त होते. दरम्यानच्या काळात प्रभारी सभापती म्हणून उपसभापती शंकरराव पाटील तळेगावकर यांनी काम पाहिला. यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष काशीनाथ गरीबे, चेअरमन दगडू साळुंखे, जिल्हा परिषद सदस्य प्रशांत पाटील जवळगेकर, पृथ्वीराज शिवशिवे भाजपाचे जेष्ठ नेते हावगीराव पाटील, बसवराज पाटील, मनोहर पटणे,उपसभापती शंकरराव पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती बालाजी बिरादार, पंचायत समिती माजी सभापती सत्यवान कांबळे, माजी सभापती सौ.चित्रकला धनाजी बिरादार, माजी नगराध्यक्ष वैजिनाथ अष्टूरे, माजी नगरसेवक बाबूराव इंगोले, मछींद्र नरवटे, रामलिंग शेरे, सुधीर भोसले प्रशांत पाटील दवणहीप्परगेकर, यांच्यासह उपस्थित होते.

# देवणी युवक राष्ट्रवादी शहराध्यक्षपदी जितेंद्र शिवगे



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथील जितेंद्र प्रभुराव शिवगे यांची युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या देवणी शहराध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली. हि निवड राज्यमंत्री संजयजी बनसोडे, आमदार बाबासाहेब पाटील, आमदार विक्रम काळे यांच्या शिफारशीने व प्रदेश अध्यक्ष महेबुब शेख यांच्या आदेशाने लातुर जिल्हाध्यक्ष चंदन बस्वराज पाटील यांच्या हास्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी पंचायत समीतीचे सभापती शिवाजीराव मुळे, देवणी तालुक्याचे अध्यक्ष प्रा.अनिल इंगोले, युवकचे अध्यक्ष सचीन गवळी, नवनाथ गायकवाड, फेरोज शेख, सचीन घाळे, रविंद्रकुमार बिरादार, ओम पाटील, तबरेज पठाण, मनोज कानडे यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते जितेंद्र शिवगे यांच्या निवडीबद्दल देवणी शहरात सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अजणीत गणवेश वाटप



**देवणी तालूक्यातील अजणी येथे बुधवारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पहिली ते चौथी पर्यतच्या विद्यार्थींना सरपंच राह्याबाई बिरादार व उपसरपंच गजानन गायकवाड यांच्या हस्ते गणवेश वाटप करण्यात आले व तसेच शाळेचे मुख्यध्यापक बिरादार श्रीधर, शाळेतील शिक्षक सूर्यवंशी ज्ञानोबा, राजाबाई सूर्यवंशी व तानाजी बिरादार, रमेश गायकवाड, रमाकांत सूर्यवंशी व ग्रामस्थ उपस्थित होते.**

# राष्ट्रसंत श्री गाडगे महाराज यांची उदगीर येथे जयंती साजरी



**देवणी/प्रतिनिधी**

उदगीर येथे संत गाडगेबाबा महाराज चौक शेतकी निवास येथे दरवर्षी प्रमाणे राष्ट्रसंत श्री गाडगे महाराज यांची जयंती साजरी करून गाडगे महाराजांच्या विचारांना स्मरण केले गेले यावर्षी करोणा महामारी च्या पार्श्वभूमीवर व शासनाने घातलेल्या निर्बधांचे नुसार अत्यंत साध्या पद्धतीने जयंती साजरी करण्यात आली मनसेचे उप जिल्हाध्यक्ष श्री संजय राठोड यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी बोलताना राष्ट्रसंत गाडगे महाराजांनी समाजातील विविध अनिष्ट प्रथांच्या विरोधात, अंधश्रद्धेच्या विरोधात समाजाला शहाणं करण्याचा कार्य केलं तसेच स्वच्छतेचे महत्व समजून सांगण्याचे कार्य राष्ट्रसंत गाडगे महाराजांनी केले जयंती मोठ्या प्रमाणात साजरी केली काय आणि साध्या पद्धतीने साजरी केली काय यापेक्षा गाडगे महाराज यांचे विचारांना अंगीकारणे हे महत्त्वाचे यांचा एक ही विचार या प्रसंगी आपण आत्मसात केला आणि आपण आपले जीवन जगू लागलो तरी खऱ्या अर्थाने यांची जयंती साजरी केल्यासारखे होईल या कार्यक्रमास मनसेचे उपजिल्हाध्यक्ष संजयराठोड, रासपाचे संघटक डॉ तेलगाने, धोबी युवा मंच तालुकाध्यक्ष अमोल गाजरे, प्रहार तालुकाध्यक्ष विनोद तेलंगे, संतोश गाजरे, बालाजी भालेराव, महादेव गाजरे, विजय तेलंगे, रवि देगलुरे, दीलीप तेलंगे, वैभव कासराळे आदी प्रमुख पदाधिकाऱ्या सह समाज बांधव उपस्थित होते.

# औसा बाजार समितीवर संचालकांची निवड

**औसा/प्रतिनिधी**

औसा कृषी उत्पन्न बाजार समितीवर राष्ट्रवादीचे दत्तात्रय व्यंकट कोळपे, पठाण वलीखॉ सरदार, उटगे संगमेश्वर बस्वराजप्पा यांची नूतन संचालक पदी मा श्री शरदचंद्रजी पवार व मा .अजित दादा पवार आणि मा बाळासाहेब पाटील यांच्या आदेशानुसार व लोकनियुक्त नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे लातूर जिल्हा कार्याध्यक्ष डॉ अफसर शेख यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देऊन औसा कृषी उत्पन्न बाजार समितीवर प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली. यावेळी नूतन संचालक पदी नियुक्ती केल्याबद्दल दि.२५ फेब्रुवारी २०२१ गुरूवार रोजी दत्तात्रय कोळपे, पठाण वलीखॉ सरदार, उटगे संगमेश्र्वर बस्वराजप्पा यांची लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ अफसर शेख यांच्या हस्ते शाल व पुष्पहार अर्पण करून त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस जिल्हाध्यक्ष पदीॲड मुस्तफा इनामदार याची निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार नगराध्यक्ष डॉ अफसर शेख यांनी केले या सत्कारा प्रसंगी माजी नगराध्यक्ष मेहराज शेख, मुजाहेद शेख, पाणीपुरवठा सभापती गोंवीद जाधव,भरत सूर्यवंशी, रुपेश दुधनकर,कृष्णा सावळकर, यशवंत भोसले, ॲड मुस्तफा इनामदार आदि राष्ट्रवादीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिवजयंती निमित्त शिक्षक, विद्यार्थ्यांनी तंबाखू मुक्त आणि आरोग्यदायी जीवनाची घेतली शपथ



**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील होनाळी येथील सरस्वती माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी शिवजयंती निमित्त आरोग्यदायी तंबाखू मुक्त जीवणाची शपथ घेतली. भारत सरकारच्या राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था तंबाखू मुक्त करण्याच्या दृष्टिकोनातून आपली शाळा, कुटुंब व परिसर तंबाखू मुक्त करण्याचा संकल्प सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर होनाळी येथील सरस्वती माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षेकेतर कर्मचारी व विध्यार्थी यांनी शपथ घेऊन शिवजयंती साजरी केली. यावेळी विद्यार्थ्यांकडून तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम या विषयावर निबंध स्पर्धा व तंबाखू मुक्ती चे पोस्टर प्रदर्शन भरवण्यात आले होते. यावेळी तंबाखू नियंत्रण समितीच्या प्रमुख पदी सहशिक्षक सुधीर साबणे यांची निवड करण्यात आली. यावेळी नुतन सरपंच सतीश बिरादार, मुख्याध्यापक एम.एन.काकनाळे, सुभाष बिराजदार, धोंडिबा बिरादार, सुनील पाटील, गंगाधर बिरादार, दीपक इंद्राळे, राजकुमार देशमुख यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल....
www.crimesandhya.com 9890718873



## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'बी' विरार पुर्व, मुख्य कार्यालय-विरार**
**(दुरध्वनी क्रमांक ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३)**

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र | पावती क्रमांक | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | तुळींज-२ | NL02/856/7 | ४१४२ | शिवम इंटरप्रायजेस | विद्या कमलेश गुप्ता |
| २. | तुळींज-७ | NL07/517/59 | ४१४४ | प्रिया इंटरप्रायजेस | संतोष रामस्वरूप गुप्ता |
| ३ | तुळींज-२ | NL02/722/138 | ४१४७ | उदय यशवंत तांबे | उत्तम पांडुरंग जाधव |
| ४ | तुळींज-७ | NL07/527/2 | ४१५० | मे गरीब नवाज डेव्ह.तर्फे मो. शाहीद शौकत शेख | महेंद्र सदाशिव पवार |
| ५ | तुळींज-७ | NL07/14/78 | ४१५३ | जोसी चुल्की | सुहासिनी दत्ताराम डांगमोडेकर |
| ६ | तुळींज-३ | NL03/1056/84 | ४१५५ | महेश बबन नाईक | चंद्रकला चंद्रकांत सौदांळकर |
| ७ | तुळींज-२ | NL02/1016/10 | ४१५७ | विष्णू शुक्ला | नियाझ अहमद मोहम्मद हारून अन्सारी |
| ८ | तुळींज-४ | NL04/443/1 | ४१५९ | आसाराम नाथू खोडे | रत्ना आसाराम खोंडे |
| ९ | तुळींज-५ | NL05/356 | ४१६१ | बचई राम यादव | गीता रामचंदर यादव |
| १० | तुळींज-४ | NL04/346/62 | ४१६३ | सागर माजी | सचिन प्रकाश घाडगे व निलिमा सचिन घाडगे |
| ११ | तुळींज-२ | NL02/102/21 | ४१६९ | लालसा हरिहर गुप्ता | महादेव बाळू जंगम |
| १२ | तुळींज-३ | NL03/1042/14 | ४१७१ | देबोब्रतो आनंदचंद्र दास | आसिया बेगुम सलाहुद्दीन शेख व सलौद्दीन मोहम्मद गौसुद्दीन शेख |
| १३ | तुळींज-५ | NL05/335/71 | ४१७५ | श्री सर्वेश्वरी कंस्ट्रक्शन | सुनिल बाबू अलिम व शिवानी सुनिल अलिम |
| १४ | तुळींज-५ | NL05/335/70 | ४१७७ | श्री सर्वेश्वरी कंस्ट्रक्शन | संदीप बी अलिम व विना अलिम |
| १५ | तुळींज-३ | NL03/677/76 | ४१८१ | मे साई बाबा कंस्ट्रक्शन | सरला सुनिल गोलाईत |
| १६ | तुळींज-७ | NL07/495/27/1 | ४१९० | स्वाती बालकराम सोनकर | प्रतिमा ब्रिजकिशोर शर्मा |
| १७ | तुळींज-२ | NL02/751/1 | ४१९२ | संजय नाना जाधव | रिया संजय जाधव |
| १८ | तुळींज-२ | NL02/751/37 | ४१९४ | संजय नाना जाधव | सिद्धेश संजय जाधव |
| १९ | तुळींज-५ | NL05/323/5 | ४१९६ | संजय नाना जाधव | सिद्धेश संजय जाधव |
| २० | तुळींज-५ | NL05/323/3 | ४१९८ | संजय नाना जाधव | सिद्धेश संजय जाधव |

जावक क्र. वविशम/कवि/३१८९/२०२०-२०२१
दिनांक : २५/०२/२०२१

सही/-
**सहा.आयुक्त**
प्रभाग समिती 'ब' विरार पुर्व
वसई विरार शहर महानगरपालिका

01 TO 07 MARCH 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 27/02/2021 8:19 PM Page 1



पान ३ वरून....

## वालीव तलाठी रीना अत्राम यांचा ...

आदीसाठी अर्ज केले असता आर्थिक देवाण घेवाण केल्याशिवाय फेरफाराचे काम होत नाही. शेतकऱ्यांनी ७/१२ उतारा नावे करण्यासाठी त्यांना विचारणा केली असता वसई तहसीलदार मॅडमने आम्हाला वसुली करण्याचे काम दिले असल्यामुळे आम्हाला वेळ नाही, असे उडवा-उडवीची उत्तरे देतात. वालीव तलाठ्यांच्या या आडमुठे धोरणामुळे अनेक शेतकरी त्रस्त झाले आहेत. कारण त्यांचे कोणतेही काम वेळेवर होत नाही. अत्राम मॅडम या बऱ्याच वर्षांपासून त्याच कार्यालयात कार्यरत असल्याने त्यांची मनमानी सुरु आहे. ज्या अर्जदारांकडून पैशाचे आर्थिक व्यवहार होतात त्यांचीच फेरफार व जमिनी संबंधीत असलेली कामे होतात. म्हणूनच आमच्या या तक्रारीची दाखल घेऊन तलाठी रीना अत्राम यांच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी प्रजा सुराज्य पक्षाने वसईच्या तहसीलदारांकडे केली आहे.

## संशयाने संसाराची वाताहत ...

लागणार त्याचा आवाज हा होणारच असे असते. मुळात बहुतांशी घरा घरात सासू सुनेचे कधीच पटत नसते. त्या दोघीत कोणत्या ना कोणत्या कारणातून क्षुल्लक कारणातून भांडण हे होत असते. तसेच काहीसे अर्चनाचे तिच्या सासू बरोबर होत होते. त्या दोघीत नेहमी खटके उडत होते. त्या दोघींच्या भांडणात चेतनची गोची होत होती. अर्चनाचे माहेर हे जयसिंगपूर जवळील शिरोळ असल्याने सासूबरोबर भांडण झाले की ती आपल्या माहेरी निघून जात होती. त्या दोघींच्या भांडणात अर्चनाचा नवरा चेतन याची गोची होत होती. त्याने तिच्याशी प्रेमविवाह केलेला असल्याने तो अर्चनाला जास्त बोलू शकत नव्हता. तर भांडणात अर्चना ही सासूला घालून पाडून बोलत होती. याचा राग चेतनला येत होता. आता त्या दोघा नवरा बायकोत घरातील किरकोळ कारणातून भांडणे होऊ लागली होती.म्हणून त्याने आता एक चांगला निर्णय घेतला होता. तो गेल्या तीन वर्षापासून पत्नी अर्चनाला घेऊन जयसिंगपूर शिरोळ बायपास रोडवरील जयप्रकाश हौसिंग सोसायटीत भाडयाने खोली घेऊन राहू लागला होता. लग्नानंतर ते दोघे ही जयसिंगपूर येथील ल.क.अकिवाटे औदयागीक वेगवेगळ्या वसाहतीत कामाला जात होते. ती एका गारमेट कंपनीत कामाला जात होती. तर तो एका फांऊड्रीच्या कारखान्या कामला जात होता. त्याचे काम हे दोन शिफ्टमध्ये असायचे तर ती फक्त गारमेट मध्ये दिवसा जात होती. सकाळी लवकर जावून संध्याकाळी पाचच्या दरम्यान ती कामावरून घरी येत होती. अलिकडे चेतन हा मित्रांच्या बरोबर जास्तच दारू पिऊ लागला होता.दारू पिऊन घरी आला की तो अर्चनासोबत कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडण काढून तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवित होता. तुझे तुझ्या कारखान्यातील कोणाबरोबर तरी संबंध आहेत असे तो तिला म्हणायचा, त्याच्याबरोबरच तू जास्तवेळ तुझ्या मोबाईलवरून बोलत असतेस. तुमच्या दोघांचे लफडे हे बऱ्याच दिवसापासून चालू आहे ते आता माझ्या कानावर आले आहे.तु माझ्याशी प्रेमविवाह करून मला धोका देत आहेस असे म्हणून तो तिला शिवागाळ करून मारहाण करीत होता. अर्चना ही दिसायला देखणीआणि सुंदर होती. देखणी बायको ही दुसऱ्याची असते तसेच तिचे झाले होते.तिचे सौदर्य हे आता तिचा नवरा चेतन याच्या नजरेत खुपत होते. ती कामावर जाताना किंवा घरी असताना तिच्या कानाला मोबाईल हा असायचाच.ती मोबाईलवरून कुणाशी तरी बिनधास्त बोलत होती याचा राग चेतन याला येत होता.कधी कधी तर त्याच्या मनाला आपण प्रेमविवाह करून चुकलो की काय अशी शंका येत होती. कारण लग्नाअगोदरची अर्चना लग्नानंतर राहिलेली नव्हती. तिच्या राहणीमानात आणि वागण्यात फरक पडलेला त्याला दिसत होता. तो तिला कामावर जावू नकोस म्हणून सांगत होता. तरी ही ती हट्टाने कामावर जात होती. त्याला काय करावे आणि काय नको असे झाले होते. दिवसे दिवस तिच्या वागण्यातील फरक त्याला दिसत होता.म्हणून तो तिच्यावर जास्त चिडत होता. त्यातून त्या दोघांचे भांडण जास्तच वाढले होते. दारू पिऊन आला की तो तिच्याबरोबर या कारणातून भांडण वाढले होते.ती ही त्याच्याबरोबर भांडण करून आपल्या माहेरी शिरोळ येथे जात होती. माहेर बरेच दिवस राहत होती. गेल्या पंधरा दिवसापूर्वी त्या दोघा नवरा बायकोत याच कारणातून भांडण झाले होते. त्यानंतर ती आपल्या माहरी गेली होती. जयसिंगपूर आणि शिरोळ हे अंतर फार नसल्याने ती तेथूनच कामाला येत होती. त्यामुळे तो तिच्यावर जास्तच चिडून होता. त्यातच गेल्या आठ दिवसापूर्वी त्या दोघांच्या लग्नाचा वाढदिवस होता. पत्नी माहेरी गेल्याने तो फारच अस्वस्थ झालेला होता. लग्नाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन त्याला तिच्या मनातील राग काढायचा होता. पण ती त्याचा फोन ही घेत नव्हती. तिला ही त्याच्याबरोबर प्रेमविवाह करून आपली फसगत झाल्याचे वाटत होते. तिच्या ही मनात त्याच्याबद्दलचा राग हा होताच. ती आपला फोन उचलत नाही आणि उत्तर ही देत नाही म्हणून चेतनने तिला लग्नाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा या एमएमएस करून दिले होते. त्यानंतर तो दोन दिवसांनी शिरोळ येथे गेला त्यावेळी ती त्याच्याबरोबर बोललीच नाही तर सासू वासंती पुजारी यांनी ही त्याला चांगलेच खडासवले होते.ते ही त्याच्या जिव्हार लागले होते. ती बोलवून ही त्याच्याबरोबर जयसिंगपूरला राहयला येत नव्हती.त्यामुळे तो जास्तच तिच्यावर चिडला होता.दारू पिऊन त्याने तिथे धिंगाणा घातलेला होता. त्यावेळी तिने व त्याच्या सासूने त्याला पोलीस स्टेशनला नेऊन समज देण्याची धमकी दिली होती. त्यावेळी तो ही त्यांना रागाच्या भरात बरेच काही बोलुन गेला होता. लग्नाअगोदरचे प्रेम लग्नानंतर राहिलेले नव्हते हेच आता त्या दोघांच्या भांडणात झाले होते. तो त्यावेळी तसाच माघारी फिरला होता. जयसिंगपूर येथे आला होता. बारला जावून त्याने दारू आपल्या घशाखाली ओतली आणि तो विचार करू लागला होता. त्याला पत्नी अर्चनाचे विवाहबाहय संबंध असल्याची खात्रीच वाटू लागली होती. वारंवार त्याच्या डोक्यात तोच विषय घुमत होता. ती सांगून ही ऐकत नाही तिचे बाहेर कुणाबरोबर तरी लफडे असावे म्हणून ती आपल्याला किंमत देत नाही.याचा तो विचार करीत होता. शेवटी तो एका निष्कर्षापर्यत पोहचला होता. तिचे बाहेर लफडे असले म्हणून ती आपल्याबरोबर राहयला येत नाही. आणि पूर्वीसारखी त्या संबंधात जास्त रिस्पॉन्स ही देत नाही आता त्याने तिच्याबाबत वेगळाच विचार केलेला होते. तो बारला बसला असताना त्याचा एक मित्र तेथे आला त्याने त्याला दारूच्या नशेतच तुझ्या बायकोचे कुणाबरोबर तरी संबंध आहेत आणि ती त्याच्या बरोबर त्याच्या गाडीवरून कामावर येत जात असते असे सांगून त्याच्या जखमेवर मीठच चोळले होते.त्यातच त्याने जास्त दारू पिली आणि त्या नशेतच घराकडे आला तो विचार करीतच तसाच झोपी गेला. त्या रात्री त्याने बराच विचार केला.मित्राने सांगितलेले त्याच्या मनात ही बसले होते. आता त्याची खात्री पटलेली होती.ती आपल्या घरी आपल्या बरोबर राहयला ही येत नाही म्हणजेच तिचे बाहेर लफडे हे असणारच याची त्याने मनात खून गाठ बांधली.

दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवार दि.२० फेब्रुवारी २०२१ रोजी तो सकाळी ११ वाजणेच्या सुमारास ती काम करीत असलेल्या ल.क.अकिवाटे औदयोगीक वसाहतील कारखान्यात गेला. त्याने तिला घरी चल,काम आहे म्हणून सांगितले. ती त्याच्याबरोबर जायला तयार नव्हती. परंतू तो कारखान्याच्या गेटवरु तिच्याबरोबर भांडण काढत असल्याने तिने आपल्या व्यस्थापकाला सांगून घरी जावून थोडया वेळात परत येते असे सांगितले.ती त्याच्याबरोबर घरी आली. त्यावेळी तो जरा दारूच्या नशेत होता. बरेच दिवस त्याने तिच्या अंगाला हात ही लावलेला नव्हता. म्हणून तो तिच्याबरोबर लगट करीत होता. परंतू तिच्या मनात त्याच्या विषयी राग असल्याने ती चिडून होती. ती त्याला तिच्या अंगाला हात लावू देत नव्हती. माझ्यावर संशय घेता. मी दुसऱ्याला घेऊन झोपते असे तुम्ही म्हणता मग तुम्ही माझ्या अंगाला हात कशाला लावता असे ती त्याला म्हणत होती. त्यातच त्याचे टाळके सटकले होते.बायको असूनही अंगाला हात लावू देत नाही म्हणून तो तिच्याबरोबर भांडण काढून तिला शिवीगाळ करून मारहाण करीत होता. ती ही त्याला जशास तसे उत्तर देत होता. त्याभांडणात आधीच घराचा दरवाजा लावलेला होता. त्यामुळे त्याच्या भांडणाचा आवाज बाहेर जात नव्हता. त्याच्या रागाचा पारा जास्तच चढलेला होता. त्याने रागाच्या भरातच जवळच पडलेला बेल्ड घेतला आणि तिच्या हाताच्या नसा कापल्या त्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला होता. ती ओरडत विव्हळत होती.त्याचच त्याने त्याच बेल्डने तिच्या गळयावर ही वार केले. तेथून ही रक्ताची चिळकांडी लागली हाताच्या नसातून आणि गळ्यातून मोठया प्रमाणात रक्त स्त्राव सुरू झाल्याने ती जागीच रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडली.त्यातच तिचा जागीच मृत्यू झाला. हे बघून तो गोंधळला आपल्या पत्नीचा आपल्या हातून खून झाल्याचे बघून तो भांबवला असल्याने त्यातच त्या दोघांचे भांडण शेजारच्या सगळ्यांना माहित होते. तो तिच्यावर चारित्र्याचा संशय घेऊन मारहाणी करीत असतो हे नातेवाईकांना ही माहित असल्याने आता आपली काही धडगत नाही पोलीस येणार आणि आपल्याला पकडणार या विचाराने त्याला घाम फुटला त्यावेळी त्याने कसाबसा दरवाजा उघडला त्यावेळी बाहेरच्या लोकांना ही त्याच्या घरात काय घडले आहे हे समजले होते. लोक आत येईपर्यत म्हणजे तोपर्यत चेतनने घरातील किटकनाशक बाटली घेतली आणि विष्र प्राशन केले. तो ही अर्चनाच्या शेजारीच तळमळत पडला.हे बघून शेजारचे लोक घटनास्थळी आले त्यांनी त्याला लगेच जयसिंगपूर येथील खाजगी रूग्णालयात उपचारासाठी केले.तर काहींनी या घटनेची माहिती जयसिंगपूर आणि शिरोळ पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच जयसिंगपुर आणि शिरोळ पोलीस जयप्रकाश हौसिंग सोसाटीतील घटनास्थळी दाखल झाले होते. ही घटना शिरोळ पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असल्याने शिरोळ पोलीस स्टेशनचे स.पो.नी शिवानंद कुंभार, यांच्या मार्गदर्शनाखाली शिरोळ पोलीसांनी या घटनेचा आणि घटना स्थळाचा पंचनामा करून मृतदेह शिरोळ येथील प्राथमिक रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवून देऊन या घटनेची माहिती शेजारच्या लोकाकडून आणि चेतन याच्या नातेवाईकाकडून घेतली होती. या घटनेची माहिती पोलीसांनी अर्चनाच्या शिरोळ येथील तिची आई वासंती पुजारी यांना दिली होती. त्या ही आपल्या इतर नातेवाईकासह घटनास्थळी आली होती. त्यांनी आपल्या मुलीचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह पाहून मोठा हंगामाच केला होता. त्या पोलीसांना रडून रडून आपल्या जावयानेच मुलीचा घात केल्याचे सांगत होत्या. पोलीसांनी त्याच्याकडून या घटनेची सविस्तर माहिती घेतली. शिरोळ पोलीस ठाण्यात या घटनेची फिर्याद वासंती पुजारी वय ५१रा. विजयसिंह नगर शिरोळ यांनी दिली होती. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी शिरोळ पोलीसात अर्चना चेतन घोरपडे (वय २५) हिच्या खून प्रकरणी तिचा नवरा चेतन मनोहर घोरपडे (वय ३२) रा.जयप्रकाश हौसिंग सोसायटी याच्या विरोधात गु.रजि.नं. ३८/ २०२१ भा.दं.वी.कलम ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता.चेतन यास उपचारासाठी दवाखान्यात दाखल केले असल्याने उपचारानंतर त्याला ताब्यात घेणार असल्याचे पोलीसांनी सांगितले होते.या घटनेचा तपास शिरोळ पोलीस स्टेशनचे स.पो.नी.शिवानंद कुंभार याच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ. डी.डी. सानप, पो.हे.कॉ.सागर पाटील हे करीत आहेत. चारित्र्याच्या संशयावरून सुरू झालेले नवरा बायकोचे भांडण हे कधीच मिटत नसते.ते कधी ना कधी वेगळे वळण घेते आणि त्यातूनच अशा खूनाच्या घटना घडतात हेच दिसून येते.

## वासनांध बँक म्यॅनेजरने अब्रू तिची ...

आकर्षक पेहराव आणि त्यावर सुगंधी परफ्युमचा भपका सोडत तिने मैत्रीणीसोबत बँक गाठली. बँक व्यवस्थापकाची स्वतंत्र कॅबीन असलेल्या दरवाज्यावर अशोकनाथ शर्मा असे ठळक अक्षरात लिहीले होते. दरवाजा हळूच ढकलत सर आत येवू शकते का? असे तिने शाखा व्यवस्थापक अशोकनाथ शर्मा यास अदबीने सुमधूर आवाजात विचारणा केली. सुमधुर आणि मंजुळ आवाज कानावर पडताच अशोकनाथ शर्मा याने मान वर करुन पाहिले असता दरवाजात एक लावण्यवती उभी होती. मनमोहक ललनेचे रुप बघून मनाने घायाळ झालेल्या अशोकनाथ शर्मा याने सायली व तिच्या मैत्रीणीला आत बोलावून बसण्यास सांगीतले. कॅबीनमधील एसीच्या थंड हवेने सायलीच्या चेहऱ्यावर स्मित हास्य खुलण्यास वेळ लागला नाही. तिने आपला परिचय देत येण्याचे प्रयोजन व्यवस्थापक शर्मा यास सांगितले. कर्ज प्रकरणाशी संबंधीत चर्चा केल्यानंतर बँक व्यवस्थापक अशोकनाथ शर्माने सायलीचा मोबाईल क्रमांक आठवणीने घेतला. काहीवेळ चर्चा केल्यानंतर सायली घरी निघून आली. त्या दिवशी अशोकनाथ शर्मा यास लवकर झोपच लागली नाही. त्याच्या नजरेसमोरुन सायलीचा मनमोहक चेहरा जाण्याचे नावच घेत नव्हता. सायली त्याच्या मनात भरली होती. वास्तविक बँक व्यवस्थापक पदावर असलेला अशोकनाथ शर्मा हा एक विवाहित होता. सायली देखील एक विवाहीत होती. तरीदेखील सुंदरा मनात भरली अशी त्याची गत झाली होती. रात्री केव्हातरी त्याला झोप लागली. मात्र झोपेत स्वप्नात देखील त्याला सायलीचा हसरा चेहरा दिसत होता. अशा प्रकारे सायलीच्या पहिल्याच नजरेत शर्मा घायाळ झाला होता. तो अधुनमधून तिच्या मोबाईल क्रमांकावर तिला संदेश देवू लागला. त्याने तिला पंधरा दिवसांनी बँकेत येवून भेटण्यास बोलावले. मात्र कामाच्या ओघात सायली बँकेत जावू शकली नाही. त्यामुळे त्याने तिला म्हटले की सुटीच्या दिवशी बँकेत गर्दी नसते. सुटीच्या दिवशी व्यवस्थीत चर्चा करता येईल. त्याने तिचा विश्वास संपादन केला होता. त्यामुळे ती देखील सुटीच्या दिवशी शर्मा यास भेटण्यासाठी बँकेत गेली. सुटीचा दिवस असल्यामुळे बँकेत ग्राहकांचा येण्याचा प्रश्नच नव्हता. शर्मा त्यावेळी बँकेत एकटाच होता. यावेळी देखील सायलीने आकर्षक आणि टिपटॉप पेहराव केला होता. तिचा आकर्षक पेहराव बघून शर्माचे काळीज जणू काही चिरले गेले. सायली खुर्चीवर बसताच त्याने तिला पिण्यासाठी शितपेय दिले. तिने नको म्हटले तरी तिला आग्रह करत त्याने ते शितपेय तिला पिण्यास भाग पाडले. शितपेय प्राशन केल्यानंतर सायलीला काही प्रमाणात गुंगी येण्यास सुरुवात झाली. तिला समोरचे अस्पष्ट दिसू लागले. तिच्या गुंगीचा फायदा घेत अशोकनाथ शर्मा याने तिच्यावर अतिप्रसंग करण्यास सुरुवात केली. आपल्यासोबत काहीतरी चुकीचे होत असल्याचा भास सायलीला होत असला तरी तिची प्रतीकार क्षमता पुरेसी नसल्यामुळे ती हतबल झाली होती. बँकेत तिसरा कुणी नसल्याचा गैरफायदा घेत अशोकनाथ शर्मा याने तिच्या संमतीविना तिच्यासोबत शरीरसंबंध प्रस्थापित केले. तसेच तिच्यासोबत विक्षीप्त फोटो काढले व अश्लील व्हिडीओ क्लिप देखील तयार केली. काही वेळाने सायलीला बऱ्यापैकी शुद्ध आली. आपल्यासोबत काय घडले याची तिला चांगल्याप्रकारे जाणीव झाली होती. शितपेयात काय होते याची तिने विचारणा केली असता शर्माने तिला उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. आता मी पोलिस स्टेशनलाच तक्रार करते अशी तिने त्याला धमकी दिली. त्यावर त्याने तिला उलटटपाली धमकी दिली की तुझे विवस्त्र अवस्थेतील फोटो व क्लिप माझ्याकडे आहे. ते फोटो व क्लिप मी व्हायरल केल्यास तुझी बदनामी होईल. तरी देखील तु पोलिसांकडे गेली तर मी आत्महत्या करेन अशी धमकी देखील त्याने तिला दिली. त्याच्या अशा बोलण्यामुळे काय करावे हे तिला सुचेनासे झाले. हा प्रकार आपल्या पतीला समजला तर घरात वाद होतील याची देखील तिला भिती वाटत होती. काही दिवसांनी अशोकनाथ शर्मा याने सायलीस लोनसंदर्भातील कागदपत्रे घेवून येण्यासाठी फोन केला. त्यावर तिने नकार दिला. नकार दिल्यानंतर देखील शर्मा याने तिला फोन व मेसेजेस करण्याचे काम सुरुच ठेवले. तु मला भेटली नाही तर मी तुझे फोटो व क्लिप व्हायरल करेन अशी धमकी त्याने तिला देण्यास सुरुवात केली. मी नाशिक येथे बहिणीच्या घरी असल्याचे खोटे सांगून तिने त्याला टाळण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याने तिला नाशिक येथे येवून फोटो व क्लिप देण्याची व भेटण्याची तयारी दर्शवली. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवत तिने नाशिकला जाण्याची तयारी केली. नाशिक रेल्वे स्टेशनवर गर्दी असल्याचे निमीत्त करत तो तिला जवळच्या एका लॉजवर घेवून गेला. त्या रात्री त्याने पुन्हा तिच्यासोबत समागम करत शरीरसंबंध प्रस्थापीत केले. यावेळी देखील भितीपोटी तिने हा प्रकार कुणाला सांगीतला नाही. माझा पत्नीसोबत घटस्फोट झाला असून मी तुझ्यासोबत लग्न करण्यास तयार आहे असे म्हणत त्याने त्या रात्री तिच्यासमवेत शरीरसंबंध केले. मला तु खुप आवडते, मी तुझ्यासोबत लग्न करेन. मी तुला काही कमी पडू देणार नाही असे म्हणत त्याने वेळोवेळी तिच्यासोबत शरीरसंबंध सुरुच ठेवले. तु तुझ्या पतीपासून घटस्फोट घे, मी तुझ्यासोबत लग्न करण्यास तयार आहे असे तो तिला सांगू लागला. त्याच्या बोलण्याला ती बळी पडली. आता ती बँक मॅनेजर अशोकनाथ शर्मा यास जेवणाचा डबा देण्यासाठी बँकेत जावू लागली. तो सांगेल तसे ती वागू लागली. त्याने तिला महाराणीसारखे ठेवण्यास सुरुवात केली. त्याने तिला मुंबई येथे भाड्याचे घर घेवून दिले. ती जळगाव सोडून मुंबई येथे राहू लागली. शनीवार आणि रविवार तसेच इतर सुटीच्या दिवशी अशोकनाथ तिला भेटण्यासाठी मुंबईला जावू लागला. मुंबईला गेल्यावर तो तिच्यासोबत शरीरसंबंध ठेवू लागला. या सर्व गोष्टीची कुणकुण सायलीच्या पतीला लागली. आपली पत्नी आपल्याला सोडून वारंवार कुठे जाते व काय करते हे तिच्या पतीला समजू लागले होते. त्यामुळे भरल्या संसारात वाद सुरु झाले होते. दोन मुलांची आई असलेली सायली बँक मॅनेजरसोबत लग्न करण्याच्या आमिषाला बळी पडली होती. तिने पतीपासून विभक्त होण्याचे ठरवले. अखेर ती तिच्या पतीपासून विभक्त झाली. आजवरचा तिचा पतीसोबत सुरु असलेला संसार एका बँक मॅनेजरमुळे तुटला होता. बँक मॅनेजर अशोकनाथ याचा त्याच्या पत्नीपासून घटस्फोट झाला नसल्याचे तिला उशीरा समजले. दरम्यान तिने तिच्या पतीला घटस्फोट दिलेला होता. तिचा चालताबोलता संसार शर्मामुळे तुटला होता. तुझ्यामुळे माझा भरला संसार तुटला असून तु माझी फसवणूक केली असल्याचे तिने शर्मा यास म्हटले. त्यावर व्हाटस ॲपच्या माध्यमातून त्याने तिच्या समाजाविषयी खालच्या थराचा उल्लेख केला. आपली फसवणूक झाली असल्याचे लक्षात आल्यानंतर तिने जिल्हापेठ पोलिस स्टेशन गाठले. पो.नि. विलास शेंडे यांची भेट घेत तिने सर्व हकीकत त्यांचेकडे कथन केली. पो.नि. विलास शेंडे यांनी तिची फिर्याद घेण्याची ठाणे अंमलदारास सुचना केली. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार संशयीत बँक मॅनेजर अशोकनाथ सिताराम शर्मा याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. ५४/२१ भा.द.वि.३७६, ५०४, ५०७, तसेच अनुसुचीत जाती जमाती कायदा व माहिती तंत्रज्ञान अधिनियमानुसार दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर या प्रकरणी पुढील तपास सहायक पोलिस अधिक्षक कुमार चिंथा यांनी आपल्याकडे घेतला. स्टेट बँक ऑफ इंडीया शिवकॉलनी शाखेचा व्यवस्थापक अशोकनाथ सिताराम शर्मा यास अटक करण्यात आली. त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. या प्रकरणी सहायक पोलिस अधिक्षक कुमार चिंथा व त्यांचे सहकारी पोलिस उप निरिक्षक सुनील पाटील, पोलिस नाईक निलेश पाटील पुढील तपास करत आहेत. (पिडीत महिलेचे सायली हे नाव काल्पनिक आहे.)

पान ८ वरून....

## भवरलालजी जैन यांच्या पोर्ट्रेटची ...

त्यानुसार ज्याठिकाणी विक्रम होत असतात अशा मोकळ्या जागेची निवड करण्यापासून तर ते पूर्ण होईपर्यत व्हिडीओ चित्रण करण्यात येते. तसेच अशा प्रकारच्या विक्रमाची नोंद होताना तुकड्या तुकड्याने प्रत्येक व्हिडोओची बारकाईने नोंद घेण्यात येते. अशीच नोंद या पोर्ट्रेटसाठीसुध्दा घेण्यात आली.

या जागतिक विक्रमाच्या नोंदीसाठी गिनिज वर्ल्ड रेकॉर्डच्यावतीने स्वप्नील डांगरीकर (नाशिक) व निखील शुक्ल (पुणे) या महाराष्ट्रातील प्रतिनिधींची नेमणूक करण्यात आली होती. गिनिज वर्ल्ड रेकॉर्डच्या प्रतिनिधींनी कोरोनामुळे ही पूर्ण कलाकृती ऑनलाईन पाहिली. याशिवाय गिनिज वर्ल्ड रेकॉर्डने जळगाव येथील आर्किटेक शिरीष बर्वे यांची सर्व्हेयर म्हणून नेमणूक केली होती. त्यांच्यासह प्राचार्य शिल्पा बेंडाळे, चित्रकार सचिन मुसळे हे या जागतिक विक्रमाचे साक्षीदार म्हणून गिनिज वर्ल्ड रेकॉर्डने नेमणूक केली होती. स्वप्नील डांगरीकर यांनी गिनिज वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र प्रदान केले.

## न्यायालयाच्या नुतन इमारत उभारणीसाठी ...

भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ॲड. ज्ञानेश्वर चेवले, ॲड. संभाजीराव पाटील, ॲड. जयश्री पाटील यांच्यासह जिल्हा वकील मंडळाचे पदाधिकारी, सदस्य व विधिज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते. जनतेच्या आर्शिवादाने मिळालेले पद ही काम करण्यासाठी एक मोठी संधी असते असे सांगून या पदाच्या माध्यमातून जनहिताची कामे अधिकाधिक प्रामाणिकपणे प्रयत्न करून पालकमंत्री असताना आपण केली असल्याचे आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी सांगितले. पद असो किंवा नसो प्रामाणिपणे जनहिताची कामे करणे आवश्यक असते. त्याचे निश्र्चितच फळ मिळते असे सांगून आज आपल्याकडे पद नसतानाही जिल्हा वकील मंडळाने आपल्याला उद्घाटक म्हणून निमंत्रीत केल्याबद्दल त्यांचे विशेष आभार व्यक्त केले. प्रामाणिक व लोकहिताचे काम केल्यास जनतेशी ऋणानुबंध अधिक घट्ट होतात ही शिकवण आक्कांनी आम्हाला दिलेली असून त्यानुसारच आमची राजकारणात वाटचाल चालू असल्याचे आ. निलंगेकर यांनी यावेळी सांगितले. लोकशाहीचा स्तंभ म्हणून न्याय व्यवस्थेची ओळख आहे. आजही न्याय व्यवस्थेवर सर्वसामान्यांचा मोठा विश्र्वास असून न्याय मिळण्यासाठी अनेकजण वेगवेगळ्या न्यायालयामध्ये कामानिमित्त येत असल्याचे आ. निलंगेकर यांनी स्पष्ट केले. लातूर हे जिल्ह्याचे ठिकाणी असून या ठिकाणी वेगवेगळी ४६ न्यायालय कार्यरत आहेत. या ४६ न्यायालयांना एकाच छताखाली आणावे अशी मागणी जिल्ह्यातील वकीलांच्या माध्यमातून आपण तात्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती याची आठवण देत उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार जुन्या विश्रामगृहाच्या परिसरात न्यायालयाची नवीन इमारत बांधावी असे सांगण्यात आलेले आहे. या नवीन इमारतीसाठी आवश्यक असलेला निधी व ही इमारत लवकरात लवकर उभारली जावी या करीता आपण शासन दरबारी पाठपुरावा करू अशी ग्वाही आ. निलंगेकर यांनी यावेळी उपस्थितांना दिली. नव्याने वकीली सुरु करणार्या वकीलांना शासनाच्या वतीने प्रतिमहा आर्थिक मदत मिळावी अशी मागणी ॲड. अण्णाराव पाटील यांनी केलेली असून ही मागणी अतिशय रास्त असल्याचे आ. निलंगेकर यांनी स्पष्ट केले. या मागणीसाठी आपण आगामी अधिवेशनात प्रश्र्न मांडून याकरीता लोकप्रतिनिधीच्या स्वाक्षर्या घेऊन शासनाकडे पाठपुरावा करू असे आ. निलंगेकर यांनी यावेळी आश्र्वासीत केले. याप्रसंगी ॲड. अण्णाराव पाटील, ॲड. किरण जाधव व ॲड. चंद्रकांत आगरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्या नंतर जिल्हा वकील मंडळाला सर्वाधिक निधी माजी पालकमंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिल्याबद्दल त्यांचा जिल्हा वकील मंडळाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा वकील मंडळाच्या वतीने आयोजीत करण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेतील विजेत्यांना आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या हस्ते पारितोषीक प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ॲड. इरफान शेख तर आभार प्रदर्शन ॲड. सचिन पंचाक्षरी यांनी केले.

## नालासोपाऱ्यात वेश्या व्यवसायाचा ...

तसेच नंदकुमार माथुर यादव, लल्लन महावीर भूयान, योगेश रामान ठाकूर व चंदन लक्ष्मी चंद्रवासी यांना ताब्यात घेण्यात आले. या छाप्यात सापडलेली पिडीत मध्यप्रदेशातील असून आरोपी सोबत तिची सात आठ महिन्या पूर्वी ओळख झाली आणि तिचा गैरफायदा घेत त्यांनी पिडितेला वेश्या व्यवसायात ढकलले. या प्रकरणी तुळीज पोलीस ठाण्यात आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. सदर कारवाई पोलीस आयुक्त सदानंद दाते व उपआयुक्त डॉ. महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक १७ सन २०२०-२०२१ (द्वितीय मागणी)**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पालघर शासकीय विश्रामगृह आवार, जुना मनोर रस्ता, वेवुर रोड, पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता 'बी-१' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०१ (एक) काम समाविष्ट आहे.

टिप : या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.com 2) http://mahatenders.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये (जी.एस.टी.वगळून) | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | कैनाड सरावली सावटा अगवण पळे डेहणे रस्ता प्रजिमा-११ कि.मी.१०/७०० येथे लहान पुलाची पुर्नबांधणी करणे. ता. डहाणू, जि. पालघर | ६२,७१,२१५/- | रस्ते व पूल (०४) जिल्हा व इतर मार्ग |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. २३/०२/२०२१ ते दि. ०२/०३/२०२१ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. ०८/०३/२०२१

**प्रत का.अ.यांनी मंजूर केली आहे.**

जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/८८१
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
शासकीय विश्रामगृह आवार,
जुना मनोर रस्ता, वेवुर रोड,
पालघर (पुर्व) - ४०१ ४०४.
दिनांक : १७/०२/२०२१

सही/-
कार्यकारी अभियंता,
सा.बां. विभाग, पालघर
*करिता*

**विमाका/कोवि/२०२०-२०२१/२०६**

# कृषि योगी, जप तपस्वी -भवरलालजी जैन

**जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगावचे संस्थापक भवरलालजी जैन यांचा स्मृतिदिन २५ फेब्रुवारी रोजी साजरा होतो. २५ फेब्रुवारी २०१६ ला वयाच्या ७९ व्या वर्षी त्यांनी शेवटचा श्वास घेतला. कार्य, कर्तृत्वाने कृषिक्षेत्रात जागतिक पातळीचे काम करणाऱ्या या कृषि योगी, जल तपस्वी व्यक्तीमत्त्वाच्या जीवनप्रवासावर प्रकाशझोत टाकणारा हा लेख खास मधु विचारच्या वाचकांसाठी.**

या पृथ्वीतलावरील मानवी जगणे प्रामुख्याने दोन गोष्टींमुळे सुसह्य होते, सहज होते, आश्वासक होते. यातील पहिला भाग हा तपश्चर्येचा असतो. दुसरा भाग म्हणजे या तपश्चर्येतून मिळणारी दूरदृष्टी प्रत्यक्षात साकारण्यासाठी अहोरात्र स्वतःला वाहून घेणारी, त्याला कष्टाची जोड देणारी व्यक्तिमत्वं, ज्यांच्यामुळे मानवी जगणे सुसह्य होत जाते. भवरलालजी जैन यांनी आयुष्यभर मानवी कल्याणासाठीच्या तपश्चर्येला अहोरात्र कष्टांची जोड दिली. या कष्टातूनच हरितक्रांतीला पायाभूत ठरणारे उच्च कृषि तंत्रज्ञान या भूमित, या महाराष्ट्रात विकसित होऊ शकले. कल्पना कणापरी ब्रह्मांडाचा भेद करी हे ब्रीद त्यांनी प्रत्यक्षात साकार करून दाखविले.

भवरलालजी जैन यांना फार मोठा औद्योगिक घराण्याचा वारसा नव्हता. जगप्रसिद्ध अजिंठा लेण्याच्या पायथ्याशी असलेल्या छोट्याशा वाकोद गावातील सामान्य अशा घरात त्यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षणाचे धडे घेतल्यानंतर पुढील शिक्षण त्यांनी जळगाव, नाशिक व मुंबई येथे घेतले. असामान्य बुद्धिमत्ता असलेल्या भवरलालजींची राज्य लोकसेवा आयोगामार्फत उपजिल्हाधिकारी पदी निवड झाली होती. शासकीय नोकरीची संधी झुगारून या व्यक्तिमत्त्वाने आपल्या आईच्या शब्दानुसार सरळ निसर्ग, पशू, पक्षी, प्राणी यांची कृषी क्षेत्रामार्फत सेवा करण्याचे निश्चित केले.

पाच दशकांपूर्वी कृषिक्षेत्रासमोरील आव्हाने, शेतकर्याचे प्रश्न आजच्यापेक्षा अत्यंत निराळे होते. तांत्रिकदृष्ट्या ते आव्हानात्मक होते. केरोसीनवर चालणार्या पंपाचा जेमतेम आविष्कार झाला होता. याला लागणारे पाईप लोखंडी किंवा सिमेंटचे होते. लोखंडी परवडणारे नव्हते तर सिमेंटचे पाईप पावलोपावली फुटायचे. त्यांची जोडणी करण्यातच शेतकरी बेजार व्हायचे. अशा या काळात कृषि क्षेत्राला नवा तंत्रिक दिलासा आवश्यक होता. सर्वसामान्य शेतकरी असलेल्या भवरलालजी जैन यांनी ही समस्या लक्षात घेऊन शेतीच्या गरजेनुरूप, पाण्याच्या उपलब्धतेनुसार शेतकर्यांना सोईचे ठरतील अशा पीव्हीसी पाईप्सचे उत्पादन सुरु केले. जोडणी करायला व हाताळणीसाठी पीव्हीसी पाईप्स सोपे असल्याने जैन इरिगेशनचे हे पहिले उत्पादन राज्याच्या प्रत्येक शेतकर्याच्या वेशीपाशी जाऊन पोहोचले. त्यांनी केवळ व्यावसायिकाची, उद्योजकाची भूमिका घेतली नाही. आपल्या उद्योगाला त्यांनी शाश्वत विकासाचे तात्विक अधिष्ठान दिले. माझ्या गावकुसाबाहेरचा सर्वसामान्य शेतकरी जर मोठा झाला तरच मी मोठा होईन ही खूणगाठ त्यांनी व्यवसायात पदार्पण करते वेळीच बांधून घेतल्याने आयुष्यभर त्यांनी स्वतःला याच कामी वाहून घेतले. छोट्यातला छोटा शेतकरी हा कसा मोठा होईल, त्याचे आर्थिक उत्पन्न कसे वाढेल याचा ध्यास घेऊन त्यांनी थोडे थोडके नव्हे तर सुमारे ५० लाख शेतकर्यांचे जीवनमान उंचावून दाखविले. ते द्रष्टे आणि कर्मयोगी मानले जातात ते यामुळेच. वाकोदसारख्या छोट्या गावातून पुढे येत आपल्या उद्योगाला विश्वाला बिलियन डॉलरची उलाढाल असलेली ग्रामीण बहुदेशीय कंपनी करणे तसे सोपे काम नाही. शेतीला लागणार्या पाईपापासून ते ट्यूबवेलच्या केसिंग पाईप पर्यंत, ऊतिसंवर्धित रोपांपासून ते ठिबक, सूक्ष्मसिंचन प्रणालीपर्यंत, फळ प्रक्रिया ते भाजीपाला निर्जलीकरण प्रक्रियेपर्यंत त्यांनी आपल्या उत्पादनांची एक विशाल-विस्तृत श्रृंखला सातासमुद्रापार पोहोचविली. एक मराठी उद्योजक सातासमुद्रापार आपल्या अस्तित्वाचा, आपल्या विस्ताराचा अमिट ठसा उमटवितो हे निश्चितच प्रत्येक महाराष्ट्रीयासाठी, भारतीयासाठी अभिमानास्पद आहे.

भारताचा भाग्यविधाता म्हणून त्यांच्याकडे पाहावे लागेल. पाच दशकांपूर्वी खर्या अर्थाने कृषिक्षेत्रातील मेक इन इंडिया'चा पाया त्यांनी रचला. यातूनच जागतिक पातळीवर सर्वाधिक आंबा फळावर प्रक्रिया करणारी प्रथम क्रमांकाची कंपनी, ऊतिसंवर्धित फळांच्या रोपांची निर्मिती करून ही व्हायरस-फ्री रोपे उच्च तंत्रज्ञानासह शेतकर्याच्या हाती सुपूर्त करणारी प्रथम कंपनी, सूक्ष्मसिंचन व ठिबक सिंचनातील दुसर्या क्रमांकाची कंपनी, सौर ऊर्जेवर चालणार्या स्वदेशी तंत्रज्ञानाची जोड देऊन, स्वदेशी तत्वाने सौर पंपाचे उत्पादन करणारी प्रथम क्रमांकाची कंपनी म्हणून त्यांनी मिळवलेला नावलौकिक हा देशाच्या उद्योग जगताचा गौरव करणारा आहे. ऊतिसंवर्धित बायोटेक्नॉलॉजीचे महत्त्व त्यांनी ओळखले. जळगाव येथे संशोधनाला भक्कम करणारी सर्वात मोठी बायोटेक लॅब त्यांनी उभारली. या लॅबला शासनाचे एनएबीएल मानांकन सुरवातीपासून लाभले. जैन इरिगेशनने निर्माण केलेल्या टिश्युकल्चर केळीच्या ग्रॅण्ड नैन या व्हरायटीने शेतकर्याचे जीवनमान उंचावले. खान्देशसारखा उष्णकटिबंधात मोडणारा जळगाव जिल्हा भारतात क्रमांक एकचा केळी उत्पादक जिल्हा म्हणून अल्पावधीतच नावारूपास आला. इथल्या केळीने देशाच्या सीमा तर तोडल्याच शिवाय पाकिस्तान सारख्या देशातही या केळीने आपला लौकीक प्रस्थापित केला. खान्देशच्या पट्ट्यात ज्या शेतकर्यांनी टिश्युकल्चर केळीला जवळ केले त्यांचे जीवनमान किती सुधारले ते त्यांच्या घरावरून आपल्या सहज लक्षात येते. भवरलालजींच्या दूरदृष्टीचे हे आणखी एक द्योतक आहे.

शेतकऱ्यांच्या भल्यासाठी ज्या काही गोष्टी असतील त्यावर संशोधन करणे व या संशोधनातून निर्माण केलेले तंत्रज्ञान शेतकर्यापर्यंत पोहोचविणे हा त्यांच्या जीवन कार्यातील एक अविभाज्य भाग होता. शेतकरी हे निरक्षर जरी असले तरी ते अज्ञानी नाहीत. त्यांना केवळ तंत्रज्ञानाप्रती सजग व साक्षर करणे आवश्यक आहे हे त्यांनी नेमकेपणाने ओळखले होते. या सजगतेतूनच अखंड भारतभर त्यांनी कृषि साक्षरतेचा यज्ञ मागील सुमारे ३ दशकांपासून सुरु केला. आजच्या घडीला भारताच्या प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक तालुक्यात त्यांनी कृषितज्ज्ञ नेमून त्यांच्यामार्फत शेतकर्यांना योग्य दिशा देण्याचे काम यशस्वी करून दाखविले. हा कर्मयोगी शेवटच्या श्वासापर्यंत थांबला नाही. शेतकऱ्यांची जी दिनचर्या असते ती शेवटपर्यंत त्यांनी पाळली. सकाळी सूर्योदयापूर्वी उठणे, उठल्यावर प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन शेतातील मातीपिकांशी मूक संवाद साधणे, त्याच्याशी एकरूप होणे, यातूनच पुढील कामाची दिशा घेणे, कार्यालयीन कामकाजातून विशेष सवड काढून काही वेळ समाज कार्यासाठी देणे ही दिनचर्या सर्वसामान्यांसारखी ठेऊन या व्यक्तिने मानव कल्याणाचाच विचार कायम बाळगला. प्रत्येकाने विविध रूपातून सामाजिक ऋणांची परतफेड केली पाहिजे याचा विसर पडू न देता काही तरी अगोदर मिळविले पाहिजे ही व्यवसायाची गुरु किल्ली त्यांनी इतरांना दिली. आपल्या व्यवसायाची उभारणी नैतिक अधिष्ठानावर करून त्यांनी नैतिकतेच्या धर्मालाच सर्वांपर्यंत पोहोचते केले. लहानपणी जिल्हा परिषदेच्या शाळेत प्राथमिक शिक्षणाचे धडे घेताना ज्या काही उणिवा भासल्या त्या लक्षात ठेऊन पुढील काळात त्यांनी योग्य वेळ येताच निवासी शाळेचे स्वप्न साकारण्यास सुरवात केली. जगातील जे चांगले शिक्षण आहे ते आपल्याच भागात विद्यार्थ्यांना मिळावे शिवाय या शिक्षणासमवेत त्यांच्यावर भारतीय संस्काराचीही पेरणी व्हावी, कार्यानुभवातून शेती मातीचेही गणित कळावे या दृष्टिने जळगावातच त्यांनी अनुभूती निवासी स्कूल सुरू केली. अवघ्या दोन वर्षातच ही स्कूल भारतातील ग्रीन स्कूल अवार्डने गौरविली गेली. ज्या मुलांना केवळ दारिद्र्याच्या शापाने योग्य शिक्षण घेता येत नाही अशा दारिद्र्य रेषेखालील मुलांसाठी निदान आपल्या गावात तरी आपण काही केले पाहिजे यासाठी ते नेहमी अस्वस्थ व्हायचे. या अस्वस्थतेतूनच त्यांनी जळगाव येथे महानगर पालिकेच्या बंद पडलेल्या शाळेच्या ईमारतीत एक अभिनव स्कूल सुरु केली. या अनुभूती इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये आज जळगावमधील दारिद्र्यात खितपत असलेल्या शेकडो मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण मोफत दिले जात आहे. येथील विद्यार्थ्यांनी साध्य केलेल्या गुणवत्तेने देशविदेशातील संस्थांचेही लक्ष वेधले गेले आहे. या शाळेत आता विदेशातील उच्च शिक्षण घेणारी बालकल्याण व शिक्षण विभागातील विद्यार्थी येऊन प्रात्यक्षिकाचे धडे गिरवून जातात.

ही मूर्ती तशी शरीराने लहान होती. मनिषा आणि उर्मी मात्र त्यांच्यात प्रचंड होती. या उर्मिवरच त्यांनी हृदय विकाराचे ७ अटॅक सहन करून दाखविले. या आजाराला ते कधीच बधले नाहीत. उलट यावर मात करण्यासाठी त्यांनी योग, निसर्गोपचार, ध्यानधारणा हे भारतीय संस्कृतिचे मार्ग अधिक जवळ केले. अद्ययावत वैद्यकीय उपचारांसह मूळ भारतीय संस्कृतितील या जीवनशैलीतून ते प्रत्येक प्रकल्पासाठी दुप्पट गतिने पुढे झेपावले. कंपनीच्या विस्तारासमवेत सामाजिक क्षेत्रातील त्यांनी निर्माण केलेली कामे ही अपरिचितांना नेहमी स्तिमित करून टाकतात. ते समाजसुधारक, विचारवंत म्हणून त्यांच्या लक्षात राहतात. महात्मा गांधींच्या जीवन कार्याला भारतातील नवीन पिढी समवेत संपूर्ण जगतालाही त्यांचा बी द चेंज'चा संदेश घेता यावा यासाठी त्यांनी मागील एक दशक पूर्णपणे स्वतःला वाहून घेतले. या दशकातील चिंतनाला त्यांनी कृतिची जोड देऊन जळगाव येथे अवघ्या काही महिन्यात जागतिक पातळीवरचे गांधीतीर्थ उभे करून दाखविले. आज या फाउंडेशनमार्फत शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त घेतल्या जाणार्या गांधी विचार परीक्षेत सुमारे २ लाख विद्यार्थी सहभागी होतात. हे म्युझियम प्रत्यक्ष पाहणार्यांची संख्या आता हजारोंनी वाढते आहे. एखादा सर्वसामान्य व्यक्ती आपल्या कार्यकर्तृत्वाने एवढा मोठा ठसा उमटवू शकते यावर कुणाचा विश्वास बसणार नाही. ते केवळ द्रष्टे नव्हते. त्यांनी साहित्याचे क्षेत्रही कुशलतेने हाताळून सिद्धहस्त लेखक म्हणूनही आपली ओळख निर्माण केली. त्यांनी पत्नीच्या योगदानावर लिहिलेले ती आणि मी' या पुस्तकाच्या लाखाच्यावर प्रती मराठी मनाच्या घराघरात पोहोचल्या आणि आता इंग्लिश व हिंदी भाषांमध्येही उपलब्ध आहेत.

जैन हिल्स आणि जैन इरिगेशन हे चालते बोलते विद्यापीठच. इथे ग्रामीण विकासापासून जलसंधारणापर्यंत, महात्मा गांधींच्या शाश्वत विकासापासून ते खेड्यातील साध्या शेतकर्यालाही समृद्धीचा मार्ग देणार्या उच्च तंत्रज्ञानापर्यंतच्या विविध शक्तींचे महात्म्य या जैन हिल्सला मिळाले. म्हणूनच की काय आपल्या गावकुसात राबणार्या शेतकर्यांचे पाय विठ्ठलाच्या पंढरी इतकेच जैन हिल्सच्या कृषिपंढरीकडे आपसुक वळतात. शेतकरी येथून उच्च कृषितंत्रज्ञानचे बळ घेऊच जातात. इथे भेट देणार्या कोणत्याही शेतकर्याला रिकाम्या हाताने परतू देणार नाही याचा ध्यासाने भवरलालजी जैन यांनी बाळगून गुरुकुल निमार्ण केले आहे. कृषिक्षेत्रात शिकणार्या शेतकर्यांच्या मुलाकडे त्यांचे विशेष लक्ष असायचे. जैन इरिगेशनने जे काही संशोधन विकसित केले आहे ते पुढील शिक्षणासाठी या विद्यार्थ्यांना खुले करून देताना त्यांनी कधीही व्यावसायिक विचाराला जवळ केले नाही. प्रत्यक्ष शेताच्या बांधावर पोहोचून त्या त्या भागातल्या मातीत रुजणारे संशोधन यावरच त्यांनी भर दिला. स्वाभाविक अनेक उच्च विद्या घेणार्या विद्यार्थ्यांचा याकडे कल असणारच. आपल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना जैन इरिगेशनच्या तंत्रज्ञानाचा, येथील शिक्षणाचा लाभ व्हावा या उद्देशाने भारतातील जवळपास सर्वच कृषि विद्यापीठांनी स्वतःहून जैन इरिगेशनशी सामंजस्य करार केला. जगातील अनेक विद्यापीठांनीही करार करून कृषि क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी भारतात हे रुजलेले तंत्रज्ञान मोलाचे आहे याची अप्रत्यक्ष पावतीच दिली.

अमेरिकेतील हार्वर्ड बिझनेस स्कूलकडे संपूर्ण जग हे उच्च शिक्षणातील परमोच्च केंद्र बिंदू म्हणून पाहते. या हार्वर्ड बिझनेस स्कूलने भवरलालजी जैन यांनी आपल्या जीवन कार्यातून जो अमूल्य ठसा उमटविला त्या सर्व कार्याचा वेध घेणार्या विषयाचा त्यांच्या अभ्यासक्रमात समावेश केला हे सहसा कुणाला ज्ञात नाही. हा गौरव त्यांच्यामार्फत संपूर्ण भारताचा गौरव आहे. ज्या आफ्रिकेकडे भारताच्या खालोखाल एक अविकसनशील खंड म्हणून सारे जग पाहते त्या आफ्रिकेतील कृषिक्षेत्राला आपण दिलासा देऊ, मार्ग देऊ या उद्देशाने त्यांनी या दशकात मोठे कार्य केले आहे. आफ्रिकेतील विविध देशात कृषि शिक्षण विस्ताराचे कार्य त्यांनाही बळ देत आहे. ही दूरदृष्टी भवरलालजींनी व्यावसायिक गणितात कधीच गृहित धरली नाही. उलट यात झळ सोसून तयारी दर्शविली हे लक्षात घेतले पाहिजे. कोणतेही राष्ट्र खऱ्या अर्थाने उभे रहायचे असेल तर त्याच्या सार्वजनिक व्यवस्थेत सर्वच पातळ्यांवर पारदर्शकता हवी ही भूमिका त्यांनी सुरवातीपासून घेतली. या त्यांच्या भूमिकेमुळे स्वतःच्या उद्योगावर होणार्या परिणामांचा त्यांनी विचार केला नाही. दोन दशकांपूर्वी लोकशाही मूल्यात माहितीच्या अधिकारासारख्या झाकून ठेवलेल्या महत्त्वपूर्ण अधिकाराला बाहेर काढून त्यांनी त्यासाठी आपली जाहीर भूमिका घेतली. माहितीचा अधिकार हा भ्रष्टाचाराला रोखणारा आहे हे लक्षात घेऊन त्यांनी समाजात जागृती केली. आजची समाजरचना..' या पुस्तकात त्यांनी घेतलेली भूमिका ही आजही आवश्यक अशी आहे. ज्या काही भूमिका त्यांनी आजवर घेतल्या त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्याचा अट्टहासही त्यांनी स्वतःच स्वतःजवळ धरला. ज्या ग्रामसुधारणाचे भाष्य त्यांनी केले त्याची अंमलबजावणी त्यांनी काही खेडे दत्तक घेऊन केली. मराठवाड्यातील दुष्काळ निवारण्याच्या उद्देशाने प्राथमिक स्तरावर जिल्हा प्रशासनासमवेत दोन वर्षांपूर्वी ४० गावांमध्ये काम करून बीड जिल्ह्याला वेगळा दिलासाही दिला. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिने त्यांनी रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त निलीमा मिश्राला सोबत घेऊन प्रायोगिक पातळीवर सुमारे १० गावांतील महिला बचत गटांसाठी काही प्रायोगिक प्रकल्पही हाती घेतले. पाण्याचे दुर्भिक्ष आणि बदलता निसर्ग ही आव्हाने भवरलालजी जैन यांनी डोळ्यापुढे ठेऊन कोरडवाहू शेतकर्यासाठी जलसंधारणाचा नवा आयाम विकसीत केला. वॉटरशेड, वॉटर हार्वेस्टींग, वॉटर कंझर्वेशन आदिंचे पथदर्शक काम जैन हिल्स येथे मोठ्या नावीन्यपूर्णतेने करण्यात आले. कृषि क्षेत्रातील, जल व्यवस्थापन, उच्च कृषितंत्रज्ञान, सूक्ष्मसिंचन आदी क्षेत्रातील त्यांच्या भरीव योगदानाबद्दल त्यांना जगात अत्यंत प्रतिष्ठेचा समजल्या जाणार्या जागतिक पातळीच्या क्रॉफर्ड रीड मेमोरियल अवॉर्डने सन्मानित करण्यात आले आहे. याच बरोबर जगातील विविध ४ विद्यापीठांनी त्यांना डॉक्टर ऑफ लिटरेचरने सन्मानित केले आहे. २००८ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री देऊन गौरविले. जैन हिल्स ही कर्मयोध्याची भूमि ठरली ती यामुळेच. इथे जे कोणी येऊन भेटून गेले त्यांना इथे केवळ प्रगतीची बिजेच मिळाली नाहीत तर याच्या जोडीला शाश्वत विकासाचा आध्यात्मिक मार्गही त्यांना सापडला. काही दिवसांपूर्वीच केंद्रीय जलसंसाधनमंत्री उमा भारती या जळगावला आल्या होत्या. या पृथ्वीतलावर अनेक अवतार होऊन गेले. यात कर्म अवतार याचे सुद्धा अनन्यसाधारण महत्त्व आहे. काही पुरुष हे आपले अलौकिक कार्य करण्यासाठीच पृथ्वीतलावर येतात. या शब्दात त्यांनी भवरलालजींबद्दल गौरोद्गार काढले. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी कर्मयोग्याच्या रुपात पाहिले. माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी त्यांना द्रष्ट्या पुरुष रुपात पाहिले. जे निरीश्वरवादी होते त्यांनी भवरलालजींना संत रुपात पाहिले. ग्रामसुधारणेसाठी संत गाडगे महाराज यांनी हाती झाडू घेऊन ग्रामस्वच्छतेचा नारा गावोगावी पोहोचविला. ग्रामगीतेच्या माध्यमातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी नैतिक अधिष्ठानाची व कर्मकांडापल्याड प्रत्यक्ष साध्या छोट्या कृतिसाठी प्रत्येक खेड्याला जागे केले. विनोबा भावे यांनी भूदान चळवळीतून भूमिहिनांना भूमी मिळवून दिली. यांच्या जोडीला जोड देऊन भवरलालजींनी या सर्व राष्ट्रसंतांच्या जीवन कार्याला जवळ करत जलबचतीचे नवे अधिष्ठान निर्माण केले. पाण्याच्या प्रत्येक थेंबाला नवी परिभाषा देणार्या भवरलालजींना महाराष्ट्रातील शेतकरी नेहमी संताच्या रूपात लक्षात ठेवेल. स्व. भवरलालजींच्या जीवनकार्याचा हा आलेख जेव्हा आपण पाहतो तेव्हा त्यांनी ७९ वर्षाच्या आयुष्यात हे कसे साध्य केले याचे आश्चर्य वाटते. त्यांच्या कामाची गती अफाट होती. कोणत्याही आव्हानाने ते डगमगले नाहीत. त्यांच्या प्रत्येक कृतीत धाडस होते. हाती घेतलेल्या कोणत्याही कामात ते एकाग्रता साधून कामे तडीस नेत. त्यांच्या अंगी असलेली ही गुणवैशिष्ट्ये त्यांच्या अशोक, अनिल, अजित, अतुल या चारही सुपुत्रांत बिंबलेली आहेत. स्व भाऊंच्या जीवनकार्याचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून त्यांचे कार्य पुढे समर्थपणे नेण्यास त्यांची पुढची पिढी सक्षम आहे त्यांचा हा वसा आणि वारसा मुल व नातवंडे पुढे नेत आहेत ही बाब खूप मोलाची ठरलेली आहे. मोठे भाऊंच्या स्मृतिंना अभिवादन!




## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'ई' नालासोपारा पश्चिम, मुख्य कर्यालय-विरार**

**दुरध्वनी : ९५२५०-२४०२१७९/२४०३२२४/२४०३२२४/२४०२५६३**

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | निळेमोरे ७ | NL३०/२५५/७ | ३६०५ | राममिलन चौहान | विजय रमेश देवरे/ज्योती विजय देवरे |
| २ | निळेमोरे ७ | NL३०/३१८/११२ | ३६०० | अरबिन कुमार शर्मा | नरबिन दुर्गा शर्मा/निशा नरबिन डी शर्मा |
| ३ | निळेमोरे ७ | NL३०/३६९/४५ | ३६६५ | चिराग एस. मोदी | प्रतिक हिराजी पवार |
| ४ | निळेमोरे ७ | NL३०/३६७/२६ | ३८८७ | उल्हास आनंदजी रांभिया | रघुनाथ जयराम शेट्ये |
| ५ | निळेमोरे ७ | NL३०/३७०/३० | ३८८२ | डि जी लँण्ड डेव्हलपर्स प्रा.लि. | रामचंद्र प्रभुनाथ राय |
| ६ | निळेमोरे ७ | NL३०/३६७/३० | ३८८७ | उल्हास आनंदजी रांभिया | धनंजय भगवान देशमुख |
| ७ | निळेमोरे ७ | NL३०/२४५/२१ | ३९९३ | विश्वास यशवंत पाडावे | यश अप्पा आंगचेकर |
| ८ | निळेमोरे ७ | NL३०/३८७/७५ | ३९९४ | पंकज अशोक गुप्ता/ अशोक कुमार गुप्ता | आलोक लालजी विश्वकर्मा |
| ९ | निळेमोरे ७ | NL३०/१९०/३९ | ४०३३ | सुरेश कालीचरण सिंह/ विरेंद्र सिंह | विभा सिंह / विरेंद्र के. सिंह |
| १० | निळेमोरे ७ | NL३०/३७७/२३ | ४०१७ | मिनाक्षी एन. तांबोली | महेंद्रकुमार एम.माली/संतोषदेवी महेंद्रकुमार माली |
| ११ | निळेमोरे ७ | NL३०/३७८/३६ | ४०४६ | महेंद्र वि.जाधव/ कल्पना महेंद्र जाधव | राजोल प्रकाशचंद्र तिवारी/ श्रद्धा राजोल तिवारी |
| १२ | निळेमोरे ७ | NL३०/३७९/८६ | ४०६२ | सचिन उमेश नागर | फरनाझ फारूख शेख |
| १३ | निळेमोरे ७ | NL३०/१६३/५ | ४०७७ | दत्ता संभाजी भोसले | आरीफ बी. रेघीवाले |
| १४ | निळेमोरे ७ | NL३०/२९९/४२ | ३५२१ | जय इंटरप्रायजेस | नम्रता नारायण शिगवण |
| १५ | निळेमोरे ७ | NL३०/४/६ | २१९७ | शाबाद म.शेख / कनिझफातमा म. शेख | महेश सुभाष तांबे/ मिनाक्षी महेश तांबे |
| १६ | निळेमोरे ७ | NL३०/३३६/५२ | ३४८२ | साई धारा इंटरप्रायजेस | चंदरप्रकाश उमापती तिवारी/रीना चंदरप्रकाश तिवारी |
| १७ | निळेमोरे ७ | NL३०/७/१० | ३५०९ | स्मीता शिरीष दुर्वे / शिरीष शंकर दुर्वे | मंजुला प्रकाश शेट्टी/ अविनाश पी. शेट्टी |
| १८ | गास | GS०५/३०२५/३९ | २०५ | पिंकी एस. वाडकर | शबनम प्रवीन |
| १९ | गास | GS०५/१३६३ | २०८ | अनसार मोहम्मद मोमिन | मोहम्मद अकरम रफीक सय्येद/रिझवान अकरम सय्येद |
| २० | आचोळे १४ | NL२३/५४/१६ | ३५६१ | मोरारजी विरजी वीरा | धीरज मोरारजी वीरा |


जावक क्र.: वविशम/कवि/७३/२०२०-२१
दिनांक : २६/०२/२०२१

सही/-
प्र.सहा.आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा प.
वसई-विरार शहर महानगरपालिका

01 TO 07 MARCH 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 27/02/2021 8:20 PM Page 1



# भवरलालजी जैन यांच्या पोर्ट्रेटची गिनिज बुकात नोंद




**जळगाव/प्रतिनिधी**

जळगावसह विविध देशात प्रसिद्ध असलेल्या जैन इरिगेशनचे संस्थापक भवरलाल जैन यांच्या पोर्ट्रेटची गिनीज बुकात नोंद घेण्यात आली आहे. जैन पाईप्सचा मदतीने प्रदीप भोसले यांनी या हे पोर्ट्रेट साकारले आहे. मोजेक प्रकारात तयार करण्यात आलेल्या या पोर्ट्रेटची गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड प्रतिनिधींनी नोंद घेतली आहे. जागतीक विक्रमाचे प्रमाणपत्र गिनीज बुक कडून देण्यात आले आहे. भवरलालजी जैन यांच्या स्मृतीदिनाच्या पूर्वसंध्येला या प्रमाणपत्राचे प्रदान करण्यात आले आहे. गुरुवारी या कलाकृतीचे लोकार्पण केले जाणार आहे. जळगावच्या जैन व्हॅली परिसरातील



'भाऊंची सृष्टी' या ठिकाणी १५० फूट लांब आणि १२० फूट रुंद असे एकुण १८ हजार चौरस फूट ही प्रतिकृती साकारण्यात आली आहे. ही कलाकृती कायमस्वरुपी राहणार असून 'भाऊंच्या वाटिके'त ती प्रेक्षकांना बघण्यासाठी उपलब्ध राहील. काळा, करडा आणि पांढरा अशा तिन रंगात पीई आणि पीव्हीसी पाईप्सच्या मदतीने ही मनोहारी भव्य कलाकृती साकारण्यात आली आहे.

### विश्वविक्रमी कलाकृती सदैव प्रेरणा देणारी –अशोक जैन

कंपनीचे सहकारी प्रदीप भोसले यांच्यासह सहकाऱ्यांनी भवरलाल जैन यांच्या जन्मदिनी ही कलाकृती अनुभूती स्कूलच्या क्रीडांगणावर साकारली होती. ती कायमस्वरूपी जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध व्हावी यादृष्टीने जैन व्हॅली परिसरातील भाऊंच्या सृष्टीतआता ही कलाकृती भव्य स्वरूपात साकारली आहे. गिनिज वर्ल्ड रेकॉर्डसाठी या कलाकृतीच्या माध्यमातून झालेला जागतिक विक्रम हा खरोखरच आनंददायी आहे. भवरलाल जैन यांच्या कार्यकर्तृत्वाची आठवण आणि प्रेरणा ही कलाकृती निरंतर देत राहिल, असे जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी या भावना व्यक्त केल्या.

भवरलाल जैन यांनी ज्या पाईप्सच्या माध्यमातून शेती केली आणि त्यांच्या कारकिर्दीचा पाया रचला त्या पाईप्सपासून मोजेक स्वरूपात ही कलाकृती साकार केली आहे. या पोर्ट्रेटसाठी पीई पाईप २५ मेट्रिक टन म्हणजेच नऊ हजार नग तर पीव्हीसी पाईप पाच मेट्रिक टन म्हणजेच एक हजार नग असे एकूण दहा हजार पाईप वापरण्यात आले. १६ ते २२ फेब्रुवारी दरम्यान सात दिवस प्रत्येक दिवशी १४ तास असे एकूण ९८ तास अर्थात पाच हजार ८८० मिनिट, ३ तीन लाख ५२ हजार ८०० सेकंदात या मोजेक स्वरूपाची कलाकृती साकारली. या कलाकृतीसाठी लागलेल्या पाईपची संख्या सरळ जोडणी केल्यास २१.९ किलोमीटर लांबीपर्यंत होऊ शकते. गिनिज वर्ल्ड रेकॉर्डची नोंद करण्यासाठी विशिष्ट प्रोटोकॉल असतो. ...पान ६ वर

# गांधी रिसर्च फाउंडेशन व मराठी विज्ञान परिषद आयोजित स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा!

**जळगाव/प्रतिनिधी**

गांधी रिसर्च फाउंडेशन व मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय नवप्रवर्तन स्पर्धेचा पारितोषिक वितरण कार्यक्रम आज दि. २८ रोजी सायंकाळी ४ वाजता ऑनलाईन पद्धतीने होत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ व गांधी रिसर्च फौऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर असतील, तर डॉ. विपिन कुमार, गुजरात विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुदर्शन अयंगार, अणुवैज्ञानिक प्रोफेसर जे. बी. जोशी, मराठी विज्ञान परिषदेचे मानद सचिव ए. पी. देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सद्यस्थितीत विज्ञानातील अनेक संशोधने व त्याचा वापर नैतिकतेच्या मापदंडावर अपयशी ठरत आहेत. म्हणूनच या कालखंडात नैतिक मूल्यांना प्राधान्य देणारे वैज्ञानिक संशोधन होणे आवश्यक ठरले आहे.

गांधी विचारांच्या पार्श्वभूमिवर ग्रामस्वराज्य' या कल्पनेला नैतिक बळ देण्यासाठी विकेंद्रित, पर्यावरणपूरक, उपयोगी व शाश्वत तंत्रज्ञान निर्माण करण्याच्या प्रक्रियेत विद्यार्थी-विद्यार्थिनीचा देखील सहभाग करून घेणे मोलाचे ठरते. त्यासाठीच या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरण, उर्जा, स्वच्छता, रोजगार व ग्रामोद्योग, कृषी, शिक्षण, सूचना व दळणवळण हे विषय स्पर्धेसाठी देण्यात आले होते. विशेष उल्लेखनीय बाब अशी की, कोरोनासारख्या आव्हानात्मक काळातदेखील या स्पर्धेत ५वी ते १० वी इयत्तेच्या १९५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांनी विविध विषयांना अनुसरून कल्पकतेने आपले नाविन्यपूर्ण प्रयोग सादर केले. विज्ञान क्षेत्रातील मान्यवर संशोधकांनी या प्रयोगांचे परीक्षण केले. त्यात पुरस्कार प्राप्त स्पर्धकांची निवड करण्यात आली. विजेत्या स्पर्धकांना ऑनलाईन पारितोषिक वितरण सायंकाळी ४ वाजता करण्यात येणार आहे. ऑनलाईन होणाऱ्या या पारितोषिक वितरण कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी https://www.facebook.com/ gandhiteerth/ live/ तसेच https://www.youtube.com/c/GandhiTeerth/ videos या लिंकद्वारे सहभागी होऊ शकता असे आवाहन गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव व मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांनी केले आहे.

# जीआयसी कंपनीच्या सीएसआर फंडातून विवेकानंद रुग्णालयास रुग्णवाहिका भेट!




**लातूर/प्रतिनिधी**

जनरल इन्शुरन्स कंपनीकडून विवेकानंद रुग्णालयास २० लाख रुपयांचा सीएसआर फंड देण्यात आला असून या निधीतून एक अद्ययावत रुग्णवाहिका व बायोकेमिस्ट्री मशिनची खरेदी करण्यात आली आहे. एका छोटेखानी समारंभात त्याचे लोकार्पण संपन्न झाले. विवेकानंद रुग्णालयाचे संस्थापक पद्मभूषण डॉ. अशोकराव कुकडे काका, डॉ. गोपीकिशन भराडिया, जनरल इन्शुरन्स कंपनीचे असिस्टंट जनरल मॅनेजर नामदेवराव कदम, रुग्णालयाचे प्रशासनिक संचालक अनिल अंधोरीकर, कार्यवाह डॉ.राधेश्याम कुलकर्णी, डॉ.ब्रिजमोहन झंवर, डॉ.गौरी कुलकर्णी, डॉ. शितल टिके,कर्मचारी व्यवस्थापक अजय कुलकर्णी, आंतररुग्ण व्यवस्थापक अनिल जवळेकर, यशवंतराव पाटील देवणीकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना नामदेवराव कदम यांनी सांगितले की,अशा पद्धतीने निधी देणे याला मदत म्हणता येत नाही.चांगले काम करणाऱ्या संस्थेला मदत करणे हे आमचे कर्तव्यच आहे. विवेकानंद रुग्णालयाशी आमचे भावनिक नाते तयार झालेले आहे. विवेकानंदच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या सेवेत माझाही सहभाग असावा अशी माझी भावना असल्याचे त्यांनी सांगितले.जिल्हा संघचालक संजय अग्रवाल म्हणाले की, आपल्याकडे चांगल्या संस्थांची कमतरता नाही.त्या संस्था देणगीदारापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. त्यांना माध्यमांनी प्रसिद्धी दिली पाहिजे. माझे आणि विवेकानंद रुग्णालयाचे मागील ५० वर्षांपासूनचे संबंध आहेत, असेही ते म्हणाले. प्रास्ताविकात डॉ. राधेश्याम कुलकर्णी यांनी जनरल इन्शुरन्स कंपनीकडून मिळालेल्या २० लाख रुपया मधून खरेदी करण्यात आलेली यंत्रसामग्री आणि रुग्णवाहिके संदर्भात माहिती देऊन कंपनीचे आभार मानले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते रुग्णवाहिकेचे लोकार्पण व मशिनरीचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी रुग्णालयातील डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते 'माझी वसुंधरा' दिनदर्शिकेचे प्रकाशन!



**लातूर/प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धन दृष्टीने नगर परिषद प्रशासन विभाग जिल्हा कार्यालयाने वृक्ष लागवड व पर्यावरण संवर्धन कार्याची सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर नगर परिषद प्रशासन विभाग जिल्हा कार्यालयाने माझी वसुंधरा नामक दिनदर्शिका तयार केली असून या दिनदर्शिकेचे सोमवार दि २२ फेब्रुवारी रोजी नवीन जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह या ठिकाणी राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे पालकमंत्री अमित विलासरावजी देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कोविड १९ जिल्हा आढावा बैठकी दरम्यान पालकमंत्री ना. अमित देशमुख यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. लातूरचे जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांच्या प्रेरणेने नगर विकास विभाग जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांच्याकडून सदर माझी वसुंधरा अभियान योजनेची दिनदर्शिका तयार करण्यात आली असून जिल्हाधिकारी बी.पी. पृथ्वीराज यांचे हस्ते पालकमंत्री ना.अमित विलासराव देशमुख यांच्यासह उपस्थित मान्यवरांना माझी वसुंधरा या दिनदर्शिकेचे वितरण यावेळी करण्यात आले. सदर दिनदर्शिकेचे पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांनी कौतुक करून माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत लातूर जिल्ह्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी या अभियानात बक्षीस पात्र होणेसाठी प्रयत्न करावेत अशा सूचना नगर परिषद प्रशासन अधिकारी सतीश शिवणे यांना केल्या. या वेळी जिल्हाधिकारी बी.पी. पृथ्वीराज, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, जिल्हा पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, मनपा विरोधी पक्ष नेते दीपक सूळ यांची उपस्थिति होती.

# न्यायालयाच्या नुतन इमारत उभारणीसाठी पाठपुरावा करणार-आ.संभाजी निलंगेकर

**लातूर/प्रतिनिधी**

न्याय व्यवस्था ही लोकशाहीचा स्तंभ म्हणून ओळखली जाते. लातूर शहरात विविध ४६ न्यायालयाच्या वेगवेगळ्या ठिकाणी इमारती कार्यरत आहेत. वेगवेगळ्या ठिकाणी या इमारती असल्याने कामानिमित्त येणार्या नागरीकांची आणि वकील बांधवाची मोठी गैरसोय होत आहे. ही वेगवेगळ्या ठिकाणी असलेली न्यायालय एकाच छताखाली आणण्यासाठी जिल्हा न्यायालयाच्या समोर असलेल्या जुन्या विश्रामगृहाच्या जागेत न्यायभवन उभारण्यास मंजूरी मिळालेली असून या ठिकाणी न्यायालयाची नुतन व भव्य इमारत व्हावी याकरीता आपण पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही माजी पालकमंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी




दिली आहे. लातूर येथील जिल्हा न्यायालयात जिल्हा वकील मंडळाच्या वतीने नवीन आयटी ग्रंथालय व जुन्या ग्रंथालयाचे नुतनीकरण करण्यासाठी पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी जिल्हा वकील मंडळाच्या मागणीनुसार डी.पी.डी.सी.च्या माध्यमातून १५ लाख रुपयांचा निधी मंजूर करुन दिला होता. या निधीतून उभारण्यात आलेल्या नवीन आयटी ग्रंथालयाचे व नुतनीकरण केलेल्या ग्रंथालयाचा उद्घाटन सोहळा माजी पालकमंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या हस्ते करण्यात आला, यावेळी आ. निलंगेकर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. चंद्रकांत आगरकर तर प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेचे सदस्य ॲड. अण्णाराव पाटील, जिल्हा वकील मंडळाचे उपाध्यक्ष ॲड. सचिन पंचाक्षरी, सचिव तथा शहर काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, कोषाध्यक्ष ॲड. गणेश गोजमगुंडे, महिला उपाध्यक्षा प्रतिभा कुलकर्णी, ग्रंथालय सचिव ॲड. दत्तात्रय पांचाळ, स्थायी समिती सभापती ॲड. दिपक मठपती, ॲड. व्यंकट बेद्रे, ...पान ६ वर

# जनजागृती महाअभियानाचे जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ यांच्या हस्ते उद्घाटन!



**पालघ/प्रतिनिधी**

प्रादेशिक लोक सम्पर्क ब्यूरो, महाराष्ट्र व गोवा विभाग, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने आयोजित जनजागृती महा अभियानाचे जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. मल्टीमीडिया व्हैनद्वारे व्हिडीओ आणि कलापथकाच्या माध्यमातून कोविड लसीकरण आणि आत्मनिर्भर भारत अभियानाविषयी सम्पूर्ण जिल्ह्यात ही जनजागृती करण्यात येईल. या वेळी जिल्हा माहिती अधिकारी राहुल भालेराव, जिल्हा आरोग्य अधिकारी दयानंद सूर्यवंशी, क्षेत्रीय प्रचार अधिकारी पराग मांदळे, जिल्हा लसीकरण अधिकारी मिलिंद चव्हाण, किशोर चव्हाण, आकाश खाडे व इतर अधिकारी उपस्थित होते. या वेळी श्री. गुरसळ म्हणाले की, कोव्हिडचा धोका अजून संपलेला नाहीये म्हणून लोकांना खबरदारी घेण्यास प्रेरित करण्यासाठी या अभियानाची खूप मदत होईल. जिल्ह्यातील कोव्हिडच्या दृष्टीने संवेदनशील भागांमध्ये या अभियानाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येईल.

## नालासोपाऱ्यात वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश

**नालासोपारा/प्रतिनिधी**

नालासोपाऱ्यातील तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील साईबाजार येथील एका इमारतीवर धाड टाकून पोलिसांनी तिथे चालणाऱ्या छुप्या वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश केला असून एका पिडीत मुलीची सुटका केली तसेच हे रॅकेट चालवणाऱ्या तीन दलालांना पोलिसांनी अटक केली. नालासोपारा येथील साई बाजारमध्ये असलेल्या रिद्धी विनायक अपार्टमेंटमध्ये वेश्या व्यवसाय चालतो अशी माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेचे स.पो.नि. महेश गोसावी यांना मिळताच त्यांनी आपले वरिष्ठ भास्कर पुकळे यांना या प्रकरणाची माहिती दिली. त्यावरून रेस्क्यू फौंडेशन कांदिवली येथील चीफ इन्वेस्टीगेशन ऑफिसर विवियन सुरेश गायकवाड व अजय भगवान कोळी यांना बोलावून सदर कारवाईकरीता महिला पोलीस उप निरीक्षक लक्ष्मी बोरकर, महेश गोसावी, बारकू चिते, विक्रम निकम, पो.हवा.पदमाने, महिला पो.शी. काजळ पाटील, पूनम जगदाळे यांच्या पथकासह रिद्धी विनायक अपार्टमेंटवर बोगस गिऱ्हाईक पाठवून छापा टाकण्यात आला व पिडीत मुलीची सुटका करण्यात आली. ...पान ६ वर

## राजीव गांधी अपघात विमा योजनेतून मिळाले ७५ हजार



**लातूर/प्रतिनिधी**

अपघातात मरण पावलेल्या तीन शाळकरी विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना जिल्हा परिषदेच्या राजीव गांधी अपघात विमा योजनेतून प्रत्येकी ७५ हजार रुपये आर्थिक मदत करण्यात आली. जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती रोहिदास वाघमारे यांच्या पुढाकारातून हा निधी मंजूर करण्यात आला.वाघमारे यांच्या हस्ते संबंधित विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना धनादेश सुपूर्द करण्यात आले. याबाबत माहिती अशी की, वर्षभरापूर्वी चाकूर तालुक्यातील अजनसोंडा, हिंपळनेर व नांदगाव येथील तीन विद्यार्थ्यांचे एका अपघातात निधन झाले होते. विद्यार्थ्यांचे अपघाती निधन झाल्यास त्यांना मदत देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने राजीव गांधी अपघात विमा योजना राबवली जाते. या योजनेच्या माध्यमातून तीनही विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना मदत मिळावी यासाठी चाकुर तालुक्याचे सूपूत्र तथा जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती रोहिदास वाघमारे यांनी पुढाकार घेतला. पाठपुरावा करून विमा योजनेतून निधी मंजूर करून घेतला. जिल्हा परिषदेत एका छोटेखानी कार्यक्रमात सभापती रोहिदास वाघमारे यांच्या हस्ते मयत विद्यार्थ्यांचे नातेवाईक, अजनसोंडा येथील संदीप बंडू तेलंगे, हिंपळनेर येथील हैदर शेख व नांदगाव येथील प्रतीक्षा कांबळे यांना धनादेशाचे वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे कृषी सभापती गोविंद चिलकुरे, शिक्षणाधिकारी भगवान फुले, भाजपाचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव बेनगिरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अशोक चिंते, महेश कांबळे, सिद्धेश्वर पवार, सुरज शिंदे, येळापुरे उपस्थितीत होते.